रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ४३
www.ramprahar.com

गुरुवार, २९ ऑगस्ट २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## पेटीएमला पेमेंट सर्व्हिसेसमधील हिस्सेदारी कमी करण्यास मान्यता

**नवी दिल्ली** : गेल्या काही दिवसापासून संकटात असलेल्या पेटीएम कंपनीला मोठा दिलासा मिळाला आहे. सरकारने पेटीएमची उपकंपनी पेटीएम पेमेंट सर्व्हिसेसमधील हिस्सा कमी करण्यासाठी मान्यता दिली आहे. त्याला पेमेंट एग्रीगेटर लायसन्स मिळण्याच्या मार्गात ही हिस्सेदारी येत होती. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने नोव्हेंबर २०२२मध्ये त्यांचा पीए परवाना अर्ज नाकारला होता. फिनटेक ब्रँड पेटीएमची मालकी असलेली कंपनी वन ९७ कम्युनिकेशन्सने एका नियामक फाइलिंगमध्ये म्हटले आहे की, पेटीएम पेमेंट सर्व्हिसेसमधील हिस्सा कमी करण्यासाठी वित्त मंत्रालयाकडून मान्यता मिळाली आहे. वन ९७ कम्युनिकेशन्सचा त्यात १०० टक्के हिस्सा आहे. आता कंपनी पीए परवान्यासाठी पुन्हा अर्ज करेल. या कालावधीत पेटीएम पेमेंट सेवा त्यांच्या भागीदारांना ऑनलाईन पेमेंट एकत्रीकरण सेवा प्रदान करणे सुरू ठेवेल.

### अंतरंग

पनवेलमध्ये ठिकठिकाणी गोपाळकाला उत्साहात/३
बंदर कामगारांना साडेआठ टक्के वेतनवाढीस मंजुरी/६
इंग्लंडचा स्टार क्रिकेटपटू डेव्हिड मलान निवृत्त/८

# देशात १२ औद्योगिक स्मार्ट शहरे उभारणार

## केंद्र सरकारचा निर्णय; रायगडातील दिघीचा समावेश

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि.२८) झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. ग्रेटर नोएडाच्या धर्तीवर नॅशनल इंडस्ट्रियल कॉरिडॉर डेव्हलपमेंट प्रोग्राम अंतर्गत देशभरात १२ औद्योगिक स्मार्ट शहरे तयार करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामधून सुमारे १० लाख लोकांसाठी प्रत्यक्ष नोकऱ्या आणि ३० लाख लोकांपर्यंत अप्रत्यक्ष नोकऱ्या निर्माण होतील.



केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिलेल्या माहितीनुसार देशांतर्गत उत्पादनाला चालना देण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाने नऊ राज्यांमध्ये १२ नवीन औद्योगिक स्मार्ट शहरांच्या निर्मितीला मंजुरी दिली आहे. यावर २८,६०२ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. प्रस्तावित १२ औद्योगिक स्मार्ट शहरांमधून १.५२ लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीच्या संधी निर्माण होतील.

या निर्णयांतर्गत नऊ राज्यांमध्ये सहा प्रमुख कॉरिडॉर तयार केले जातील. ही औद्योगिक शहरे उत्तराखंडमधील खुरपिया, पंजाबमधील राजपुरा-पटियाला, महाराष्ट्रातील दिघी, केरळमधील पलक्कड, उत्तर प्रदेशमधील आग्रा आणि प्रयागराज, बिहारमधील गया, तेलंगणामधील झहीराबाद, आंध्र प्रदेशमधील ओरवाकल, कोपर्थी आणि राजस्थानमधील जोधपूर-पाली येथे उभारण्यात येतील. केंद्र सरकारचा हा निर्णय देशाची उत्पादन क्षमता आणि आर्थिक विकासाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

### रेल्वेच्या तीन पायाभूत प्रकल्पांनाही मंजुरी

मंत्रिमंडळ बैठकीत रेल्वेच्या तीन पायाभूत प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. या प्रकल्पांमुळे रेल्वे कनेक्टिव्हिटी मोठ्या प्रमाणात वाढेल आणि प्रादेशिक विकासाला चालना मिळेल. याशिवाय मंत्रिमंडळाने कृषी निधीत वाढ केली आहे तसेच २३४ शहरांमध्ये एफएम रेडिओ सुविधा सुरू करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. यासाठी ७३० वाहिन्यांचा लिलाव करण्यात येणार आहे.

# राजकोट किल्ल्यावर ठाकरे आणि राणे समर्थक भिडले

## उद्धव ठाकरेंना टीका करण्याचा नैतिक अधिकार नाही -खासदार राणे

**मालवण : प्रतिनिधी**

राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याच्या घटनेनंतर बुधवारी (दि. २८) महाविकास आघाडीच्या वतीने निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि भाजप नेते खासदार नारायण राणे यांचे समर्थक भिडले. यानंतर खासदार राणे यांनी पत्रकार परिषद घेत ज्यांनी वडिलांचा पुतळा सरकारच्या खर्चाने बनवला त्यांना टीका करण्याचा नैतिक अधिकार नाही, अशा शब्दांत उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल केला.



प्रसारमाध्यमांशी बोलताना खासदार नारायण राणे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याची घटना दुर्दैवी होती. आठ महिन्यांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या पुतळ्याचे अनावरण केले होते, मात्र पावसाळ्यात हा पुतळा कोसळला. मी यामध्ये कोणावरही आरोप करणार नाही. कशामुळे हा पुतळा कोसळला याचे कारण बाहेर यावे व संबंधितांवर कारवाई व्हावी. हा पुतळा ज्यांनी कोणी बांधला त्यांची चौकशी करावी तसेच हा पुतळा का कोसळला याचीदेखील चौकशी व्हावी, अशी माझी व येथील जनतेची इच्छा आहे. **(पान २ वर..)**


## कर्जत गौरकामथ आदिवासीवाडीत पिण्याचे पाणी झाले दूषित

# २१ जणांना गॅस्ट्रोची लागण; रुग्णालयात दाखल

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील गौरकामथ आदिवासीवाडीत पिण्याच्या दूषित पाण्यातून २१ जणांना गॅस्ट्रोची लागण झाली आहे. प्राथमिक अंदाजानुसार टाकीमध्ये कावळा तसेच इतर जीव बरेच दिवस मारून पडून होते. त्यातून हा प्रकार घडल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

साधारण ६२ घरांची वस्ती असलेल्या गौरकामथ आदिवासीवाडीत विभागवार प्लास्टिक टाक्या बसविण्यात आल्या आहेत. **(पान २ वर..)**



**कर्जत उपजिल्हा रुग्णालय येथे गौरकामथ येथून १० रुग्ण आले होते. त्यापैकी सात रुग्णांवर त्वरित उपचार केल्याने त्यांची प्रकृती व्यवस्थित आहे, तर बॉडी डीहायड्रेट झाल्याने तीन रुग्ण अत्यवस्थ होते, परंतु योग्य उपचार केल्याने त्यांचीसुद्धा प्रकृती आता उत्तम आहे. या रुग्णांना गॅस्ट्रोची लागण झाल्याचे निदर्शनास आले आहे.**
**-विजय म्हसकर, वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय, कर्जत**

## पनवेलमध्ये उद्या आम्ही सावित्रीच्या लेकी पुरस्कार सोहळा

**पनवेल** : विविध क्षेत्रात गेल्या ३० वर्षांहून अधिक काळ उल्लेखनीय कार्य करणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि दै. लोकमत यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि. ३०) पनवेलमध्ये कर्तृत्ववान महिलांचा आम्ही सावित्रीच्या लेकी २०२४ पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे.

शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सकाळी १०.३० वाजता होणाऱ्या या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, तर विशेष अतिथी म्हणून पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव व माजी सभागृह नेते परेश ठाकूर, मराठी नाट्य-सिने अभिनेते अंशुमन विचारे यांची उपस्थिती असणार आहे.

## घटनेचे राजकारण करू नये -उपमुख्यमंत्री फडणवीस

**नागपूर** : राजकोट किल्ल्यातील राड्यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया देत या घटनेचे कुणीही राजकारण करू नये, असे आवाहन आणि सूचना केली आहे तसेच यासाठी जे जबाबदार आहेत आणि ज्यांच्यावर गुन्हे दाखल झाले आहेत त्यांना कडक शिक्षा दिली जाईल, असेही ते म्हणाले.

नागपूर विमानतळावर माध्यमांनी बोलताना उपमुख्यमंत्री व गृहमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराजांचा पुतळा कोसळणे ही दुःखद घटना आहे. अशा घटनांची योग्य चौकशी करून कोण दोषी आहेत हे समोर आले पाहिजे, त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे आणि त्या ठिकाणी पुन्हा भव्य असा पुतळा उभारला गेला पाहिजे या तीनही गोष्टींवर आम्ही लक्ष केंद्रित केले आहे. नौदलाने ही बाब गांभीर्याने घेतली असून चौकशी समिती तयार केली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागानेही पोलिसांत एफआयआर दाखल केलेला आहे. नौदलाच्या अहवालानंतर पुढील कारवाई पोलिसांकडून केली जाईल. घटना घडल्यानंतर जे जे करणे आवश्यक आहे ते केले जात आहे. तरीही विरोधकांकडून प्रत्येक गोष्टीकडे निवडणुकीच्या चष्म्यातून पाहिले जात आहे. हे अत्यंत चुकीचे असून विरोधकांनी खालच्या पातळीचे राजकारण करू नये.



### निवडक

#### महिला अत्याचारांवर समाजाला आत्मपरीक्षणाची गरज -राष्ट्रपती

**नवी दिल्ली** : महिला अत्याचाराच्या घटनांवर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी भाष्य केले आहे. कोलकाता येथील घटना धक्कादायक आणि हताश करणारी आहे. बस आता खूप झाले. ज्या वेळी कोलकाता येथे विद्यार्थी, डॉक्टर आणि नागरिक आंदोलन करत होते तेव्हा या प्रकरणातील आरोपी खुलेआम फिरत होते, असे राष्ट्रपती म्हणाल्या. पीटीआय या वृत्तसंस्थेशी बोलताना पुढे त्यांनी, कोणताही सुसंस्कृत समाज मुलींवर असे अत्याचार होऊ देऊ शकत नाही. समाजाला आता प्रामाणिकपणे आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे. नागरिकांनी स्वतःला कठीण प्रश्न विचारण्याची आवश्यकता आहे, असे म्हटले.

#### कमी दाबाच्या पट्ट्यामुळे चक्रीवादळाची शक्यता

**गांधीनगर** : मान्सून पुन्हा एकदा सक्रिय झाला आहे. अशातच गुजरातमध्ये कमी दाबाचा पट्टा अधिक सक्रिय होण्याची चिन्ह असून त्याचे चक्रीवादळात रूपांतर होण्याची शक्यता आहे, तर दुसरीकडे राजस्थानमध्येही वादळी प्रणाली अरबी समुद्राच्या दिशेने पुढे सरकत आहे.



**पनवेल : भाजप व युवा मोर्चा पनवेल शहर यांच्या वतीने आमदार चषक दहीहंडी उत्सवाचे आयोजन शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहासमोरील आवारात करण्यात आले होते. आमदार प्रशांत ठाकूर यांनी या उत्सवाला भेट देत शुभेच्छा दिल्या. ही हंडी फोडण्याचा मान कोळीवाड्यातील जय महाराष्ट्र शिवतेज व्यायामशाळा मंडळाने मिळवला. त्यांना माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते बक्षीस आणि आकर्षक ट्रॉफी देऊन गौरवण्यात आले. (वृत्त व अधिक छायाचित्रे पान ८ वर..)**







**उलवे नोड : भाजप आणि महिला मोर्चा उलवे नोड यांच्या वतीने भव्य दहीहंडी उत्सव माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात झाला. ही हंडी फोडण्याचा मान मुंबईतील मार्लेश्वर महिला मंडळ आणि आई एकवीरा मंडळाच्या पथकाने मिळविला. त्यांना लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले. या वेळी सुप्रसिद्ध सिनेअभिनेत्री सोनाली कुलकर्णी उपस्थित होती. (वृत्त व अधिक छायाचित्र पान ३ वर..)**

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीतून अजिवली येथे विकासकामांचा शुभारंभ

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील अजिवली येथे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या २६ लाख रुपयांच्या स्थानिक विकास निधीतून करण्यात येणाऱ्या रस्त्यांचे भूमिपूजन व उद्घाटन भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते बुधवारी (दि. २८) झाले.

पनवेल तालुक्यासह विधानसभा मतदारसंघात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली सर्वांगीण विकासाची कामे सुरू असून नागरिकांना सुविधा देण्यासाठी त्यांचे नेहमीच प्राधान्य असते. त्यानुसार त्यांच्या १६ लाख रुपयांच्या स्थानिक विकास निधीतून अजिवली येथे तबेला ते बौद्धवाडा रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात आले आहे तसेच १० लाख रुपयांच्या निधीतून रा.जि.प. शाळा ते हसुराम माळी यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते हे भूमिपूजन आणि उद्घाटन झाले.

या कार्यक्रमास भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, **(पान २ वर..)**



## कुष्ठपीडित संघटनेतर्फे आज पनवेलमध्ये अधिवेशन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र कुष्ठपीडित संघटनेच्या वतीने गुरुवारी (दि. २९) सकाळी १० वाजता पनवेल मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात कुष्ठपीडित व्यक्तींचे एकदिवसीय अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे.

या अधिवेशनास प्रमुख अतिथी म्हणून माजी राज्यपाल राम नाईक आणि आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती लाभणार आहे, तर पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, 'अपाल' अर्थात कुष्ठरुग्ण प्रभावित व्यक्तींच्या संघटनेच्या अध्यक्ष मायाताई रनवरे, शांतिवनचे उदय ठकार, महाराष्ट्र व मध्य प्रदेश प्रोग्राम ऑफिसर सचिन पाटीदार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या वेळी कुष्ठरुग्ण वसाहतीतील प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा तसेच महाराष्ट्र कुष्ठपीडित संघटनेच्या माजी अध्यक्षांचा सत्कार केला जाणार आहे. या अधिवेशनास उपस्थित राहण्याचे आवाहन कुष्ठपीडित संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र चव्हाण, सचिव अशोक आंबेकर यांनी केले आहे.

# विवेक पाटलांच्या जामीन अर्जावर आज सुनावणी

**पनवेल : प्रतिनिधी**

कर्नाळा नागरी सहकारी बँकेतील ५१२.५० कोटी रुपयांच्या घोटाळाप्रकरणी शेकापचे माजी आमदार आणि बँकेचे अध्यक्ष विवेक पाटील यांच्या जामीन अर्जावर बुधवारी (दि. २८) पनवेल जिल्हा न्यायालयात सुनावणी होती, मात्र ती होऊ शकली नाही. आता न्यायालयाने २९ ऑगस्ट ही तारीख दिल्याने त्यांचा जेलमधील मुक्काम आणखी एक दिवसाने वाढला आहे.




बोगस कर्ज प्रकरणात ईडीने विवेक पाटील यांना अटक केली होती. त्या प्रकरणात ईडीच्या मुंबई उच्च न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला, मात्र पनवेल न्यायालयात गुन्हे अन्वेषण विभागाच्या आर्थिक शाखेने दाखल केलेल्या गुन्ह्यात अद्याप जामीन न मिळाल्याने त्यांचा मुक्काम अजून तळोजा तुरूंगातच आहे.

पनवेल जिल्हा न्यायालयाने विवेक पाटील यांच्या जामीन अर्जावर सुनावणी करण्यासाठी २१ ऑगस्ट, त्यानंतर २८ ऑगस्ट ही तारीख दिली होती. बुधवारी न्यायालयाने या जामीन अर्जावर विचार करण्यासाठी आता २९ ऑगस्ट ही पुढील तारीख दिली आहे.

कर्नाळा बँकेत केलेल्या ५१२.५० कोटी रुपयांच्या घोटाळाप्रकरणी शेकापचे माजी आमदार आणि बँकेचे अध्यक्ष विवेक पाटील यांच्यासह बँकेच्या संचालक मंडळातील २२ सदस्य आणि इतर अशा एकूण ८३ जणांवर पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. त्यात विवेक पाटील यांच्या चिरंजीवाचाही समवेश आहे. या प्रकरणी गुन्हे अन्वेषण विभागाच्या पुणे येथील आर्थिक शाखेच्या एसीपी मिना जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

# राष्ट्रीय धोरणाशी सुसंगत बाबी लागू करण्याचा प्रयत्न प्रशंसनीय -राज्यपाल

**पुणे : प्रतिनिधी**

संशोधन चलित शिक्षण, आंतरविद्याशाखीय शिक्षण आणि शैक्षणिक बाबींसाठी उद्योगांसमवेत सहयोग या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी सुसंगत बाबी लागू करण्याचा सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाचा प्रयत्न प्रशंसनीय आहे, असे गौरवोद्गार राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी काढले.



सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या पहिल्या पदवीप्रदान समारंभात राज्यपाल बोलत होते. या वेळी विद्यापीठाच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष डॉ. प्रमोद चौधरी, कुलगुरू प्रा. सुनील भिरुड, कुलसचिव डॉ. दयाराम सोनवणे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालक डॉ. यशोधरा हरिभक्त आदी उपस्थित होते.

सीओईपी ही संस्था शैक्षणिक उत्कृष्टतेची दीपस्तंभ असून संस्थेच्या पहिल्या पदवीदान समारंभास उपस्थित राहताना आनंद होत असल्याचे सांगून पूर्वेकडील ऑक्सफर्ड आणि राज्याची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखले जाणारे पुणे शहर दीर्घकाळापासून शिक्षणाचे माहेरघर आणि सांस्कृतिक पुनर्जागरणाचे केंद्र आहे. ही संस्था केवळ शहरच नव्हे तर संपूर्ण देशात तंत्रज्ञानातील नवकल्पना आणि शैक्षणिक विद्वत्तेचे केंद्र म्हणून आपली एक वेगळी प्रतिष्ठा जपत असताना भरभराट करीत आहे. पदवीदान समारंभातील दीक्षांत मिरवणुकीचे नेतृत्व एक महिला करीत असल्याचे पाहून विद्वान, नेतृत्व आणि बदल घडवणाऱ्या म्हणून स्वतःची भरभराट करू शकतील अशा महिलांसाठी सर्वसमावेशक वातावरणास प्रोत्साहन देण्याची विद्यापीठाची समर्पण भावना दिसून येते, असेही राज्यपाल म्हणाले.

या वेळी कुलगुरू डॉ. सुनिल भिरूड यांनी सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या भविष्यकालीन उपक्रमांबाबत माहिती देऊन विद्यापीठ अहवालाचे वाचन केले. माहिती देताना ते म्हणाले, आजच्या पदवीदान समारंभात विद्यापीठातील २४६ पदव्युत्तर विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात येत असून विविध विद्याशाखांमध्ये प्रथम क्रमांकाची कामगिरी करणाऱ्या १२ विद्यार्थ्यांना रँक प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात येत आहे. याशिवाय ७७७ पदवीधर विद्यार्थ्यांना उत्तीर्ण प्रमाणपत्रे, उत्कृष्ट कामगिरीसाठी नऊ पदवीधर विद्यार्थांना सुवर्णपदके प्रदान करण्यात येत आहेत.

# प्रवाशांची समस्या दूर झाली याचे समाधान -आमदार रविशेठ पाटील

## पेण एसटी बसस्थानकाची केली पाहणी

**पेण : प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षांपासून पेण, रामवाडी आणि वडखळ या तीनही बसस्थानकांची दूरवस्था झाली होती. या तीनही बसस्थानकांतील रस्त्यांच्या काँक्रीटीकरणाचे काम युद्धपातळीवर सुरू झाले असून गणेशोत्सवापूर्वी तीनही बसस्थानक प्रवाशांसाठी खुले व्हावे याकरीता पेण विधानसभा मतदारसंघाचे आमदार रविशेठ पाटील यांनी पाहणी केली.



आमदार रविशेठ पाटील यांनी या कामाबाबत समाधान व्यक्त करीत या बसस्थानकाचे रूपडे पालटणार असून प्रवाशांची खऱ्या अर्थाने आता समस्या दूर होणार आहे. यापूर्वीचा या तिनही बसस्थानकांचा विचार केला असता बसस्थानकात नेहमीच चिखल आणि घाणीचे साम्राज्य तर भर पावसाळ्यात गुडघाभर पाण्यातून प्रवाशांना बसमध्ये चढावे-उतरावे लागत होते. त्यामुळे विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिक पुरते हैराण झाले होते. आता सिमेंट काँक्रिटच्या कामामुळे हे तिनही बसस्थानक चकाचक होत आहेत. यासाठी आमदार रविशेठ पाटील यांनी वेळोवेळी केलेला पाठपुरावा कामी आला असून एमआयडीसीच्या माध्यमातून सदरचा आलेल्या निधीतून हे काम होत आहे.

या वेळी ठेकेदार राजू पिचीका, एसटी विभाग नियंत्रक दिपक घोडे, बसआगार व्यवस्थापक अपर्णा वर्तक, वडखळ ग्रामपंचायत माजी सरपंच योगेश पाटील, प्रभाकर पाटील आदी उपस्थित होते.

# नेरळमध्ये अंगणवाडीसमोरच कचऱ्याचे साम्राज्य; मुलांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

**नेरळ : प्रतिनिधी**

नेरळ मोहाचीवाडी येथील अंगणवाडीसमोर कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे. येथील लहान मुलांच्या आरोग्याचा प्रश्न उभा राहिला आहे. त्यामुळे हा कचरा लवकरात लवकर उचलावा म्हणून ग्रामस्थ आता आक्रमक झाले आहेत.



मोहाचीवाडी येथील कातकरी वाडी येथे चालवण्यात येणाऱ्या एकात्मिक बालविकास सेवा केंद्रातील अंगणवाडीसमोर कचऱ्याचा ढीग साचला असताना, अंगणवाडीसेविका तसेच ग्रामस्थांनी कचरा उचलण्यात यावा म्हणून ग्रामपंचायत प्रशासनाला निवेदन दिले होते, मात्र यावर ग्रामपंचायत प्रशासन गंभीर दिसत नाही.

सध्या पाऊस सुरू असल्याने या कचऱ्यामधून दुर्गंधी सुटून परिसरातील वातावरण दूषित झाले आहे. रोगराई पसरल्याने येथे विविध आजाराला ग्रामस्थ बळी पडले असून येथील शौचालयाचे पाणीदेखील रस्त्यावर वाहू लागल्याने परिसरात डासांचे प्रमाण वाढले आहे. येथील जागरूक नागरिक प्रशांत देशमुख आणि अमोल चव्हाण या तरुणांनी एकत्र येत आवाज उठवला.

ग्रामपंचायत प्रशासनाचे म्हणणे आहे की, या परिसरात वाहन फिरण्यासाठी जागा नाही. पाऊस असल्याने माती ओली असल्याने कचरा गाडी अडकून बंद पडू शकते म्हणून सांगण्यात आले.

# 'उबाठा'चे आंदोलन म्हणजे राजकीय गिधाडी वृत्ती

## मुंबई भाजप अध्यक्ष आमदार ॲड. आशिष शेलार यांची टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

एखादी व्यक्ती मरते का आणि आपल्याला खायला मिळते का...याची वाट पाहत गिधाडे बसलेली असतात तशीच राजकीय गिधाडी वृत्ती उबाठाची आहे. आपण स्वत: काही करायचे नाही, पण एखादी घटना, दुर्घटना घडली की त्यावर राजकीय पोळी भाजण्याचे काम उबाठा करते, अशा शब्दांत मुंबई भाजप अध्यक्ष आमदार ॲड. आशिष शेलार यांनी टीका केली.




छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा दुर्घटनेप्रकरणी बुधवारी (दि.२८) मालवणमध्ये आंदोलनकर्ते आमनेसामने आले. त्यानंतर मुंबई भाजप अध्यक्ष आमदार ॲड. आशिष शेलार यांनी मुंबई कार्यालयात पत्रकार परिषद घेऊन पक्षाची भूमिका स्पष्ट केली.

छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा पडला ही जी घटना घडली अत्यंत दुदैवी, वेदनादायी, क्लेशदायी आणि मनात संताप निर्माण करणारी घटना आहे. हा एक अपघात होता याबाबत सरकारने आपली बाजू मांडली असली तरी शिवप्रेमी म्हणून या दुदैवी घटनेबाबत सरकारच्या वतीने मी माफी मागितली आहे. आजही पुन्हा माफी मागतो, या प्रकरणी दोषी कोण हे ठरेल, सर्व चौकशा होतील आणि कारवाईसुद्धा होईल. पुन्हा उत्तम दर्जाचे स्मारक उभे ही करण्यात येईल, असे सांगून आमदार ॲड. आशिष शेलार म्हणाले की, लोकशाही आंदोलन करण्याचा अधिकार सर्वांना आहे. जे राजकीय पक्ष मालवणमध्ये आंदोलन करण्यासाठी गेले होते तसेच तिथल्या लोकप्रतिनिधींनाही आंदोलन करण्याचा अधिकार आहे. विरोधकांनी कधी सरकारच्या काही चुका असतील तर लक्षात आणून दिल्या नाहीत, मात्र दुर्घटना घडताच गिधाडासारखे आता या विषयावर राजकारण करीत आहेत.

उबाठा अशाच राजकीय गिधाडी वृत्तीने वागत असून कधी कुठली दुर्घटना, अथवा अपघात घडतोय याची वाटच पाहत बसलेले असतात. आज जे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याबाबत आंदोलन करीत आहेत त्यांनीच महाराजांच्या वशंजांकडे पुरावे मागितले होते. उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्राची अस्मिता आणि प्रतिकांचा अपमानच वारंवार केला आहे, अशी टीका ॲड. शेलार यांनी केली.

# कर्जतकरांनी अनुभवला जोशपूर्ण दहीहंडीचा थरार

## साई एकविरा पथकाने फोडली मानाची दहीहंडी

**कर्जत : प्रतिनिधी**

आमदार महेंद्र थोरवे फाउंडेशन व शिवसेना कर्जत शहर आयोजित उत्सवात दहीहंडीचा थरार कर्जतकरांनी अनुभवला. ही मानाची दहीहंडी वडाळा-मुंबईतील साई एकविरा पथकाने फोडून एक लाख २५ हजारांचे पारितोषिक पटकावले. मानाची दहीहंडी सलग दुसऱ्या वर्षी फोडण्याचा मान विठ्ठल रखुमाई आनंदवाडी नेरळ या पथकाने पटकावला.

आयोजक माजी नगरसेवक संकेत भासे, शहर प्रमुख अभिषेक सुर्वे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. या दहीहंडी उत्सवाला गायक राजा आदईकर, १००१ मथुर बैलाचे मालक राहुल पाटील, अभिनेत्री क्रांती रेडेकर, युट्यूबर विनायक माळी, रील स्टार अक्षदा पाटील, अपूर्वा पाटील यांनी उपस्थिती लावली होती. ३१ मंडळांनी आपली सलामी पूर्ण केली.

उपस्थितांमध्ये ड्रॉ घेऊन बक्षीसाचे वाटप करण्यात आले. आमदार महेंद्र थोरवे, रायगड माजी जिल्हाप्रमुख संतोष भोईर, उपजिल्हा प्रमुख भाई गायकर, महिला आघाडी जिल्हा संघटक सुरेखा शितोळे, गजू वाघेश्वर, तालुका प्रमुख संभाजी जगताप, विधानसभा मतदारसंघ संघटक शिवराम बदे, माजी उपसभापती मनोहर थोरवे, तालुका युवा सेना अधिकारी अमर मिसाळ, युवा सेना विधानसभा संघटक प्रसाद थोरवे, प्रदीप वायकर, अशोक शिंदे, नजिम खान, वैभव सुरावकर, नागरिक उपस्थित होते.



# खारपाले पथक ठरले वैकुंठ पाटील मित्र मंडळाच्या दहीहंडीचे मानकरी

**पेण : प्रतिनिधी**

भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांच्या संकल्पनेतून तांबडशेत जोहे येथे आयोजित केलेल्या दहीहंडीचा मानकरी खारपाले येथील विठाई गोविंदा पथक ठरला.

तांबडशेत, वाशी, वडखळ अशा तीन गावात एक लाख एक हजार १११ रुपये असे तीन ग्रामीण भागातील मिळून तीन लाख तीन हजार हजर ३३३ रू. रोख रक्कम व विविध बक्षिसे देण्यात आली. मुंबई, पनवेल, पेण लोकप्रिय आणि गाजलेल्या युवाशक्तीच्या दहीहंडी स्पर्धेतील बक्षिस पटकावण्यासाठी यंदाही पथकांची चुरस पहायला मिळाली.

स्पर्धेच्या उद्घाटनाला आमदार रविशेठ पाटील, भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, सरचिटणीस मिलिंद पाटील, सरपंच यांच्यासह सर्व पदाधिकारी उपस्थित होते. खारपाले येथील विठाई गोविंदा पथकाने दोनवेळा सात थर लावून सर्वाचीच वाहवा मिळवली. शेवटी तिसऱ्यांदा सात थर लावत बाळ गोपाळ चिमुकल्याने ही एक लाखांची हंडी फोडून वाहवा मिळवली. विजेत्या विठाई गोविंदा पथकाला वैकुंठ पाटील व पदाधिकारी यांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले.



## पान १ वरुन

### राजकोट किल्ल्यावर ठाकरे आणि राणे समर्थक भिडले

शिवरायांच्या पुतळा उभारणीत भ्रष्टाचार झाला, तो निकृष्ट दर्जाचा होता, याचा एकतरी पुरावा आहे का? हा पुतळा लवकरात लवकर उभारावा आणि दोषींवर कारवाई करावी या दोनच आमच्या मागण्या आहेत. यापलीकडे आम्हाला राजकारण करायचे नाही, असे खासदार राणे यांनी म्हटले.

पुढे बोलताना खासदार राणे यांनी सांगितले की, निवडणुका समोर असल्याने विरोधक याचे भांडवल करत आहेत. या जिल्ह्यात त्यांना भाजपवर टीका करण्यासाठी कोणतेही कारण मिळत नसल्याने पुतळ्यावरून आमच्यावर टीका करत आहेत. जेव्हा हा पुतळा तयार झाला तेव्हा जिल्ह्यातील लोकं महाराजांसमोर नतमस्तक झाली, मात्र आज बाहेरून आलेले सर्व पुढारी गेल्या आठ महिन्यांत कधी महाराजांच्या पुतळ्यासमोर नतमस्तक होण्यासाठी आले नाही.

ज्यांनी त्यांच्या जन्मापासून छत्रपती शिवाजी महाराज आणि हिंदुत्वाला निर्वाहाचे साधन बनवले आणि पैसे कमावले त्यांच्याकडून चांगल्या भाषेची काय अपेक्षा करणार? शिवद्रोही ठाकरेंची काय ती भाषा. त्यांनी महाराजांचा एकही पुतळा उभारला नाही. स्वतःच्या वडिलांचा पुतळादेखील सरकारच्या खर्चाने बनवला. त्यामुळे त्यांना टीका करण्याचा नैतिक अधिकार नाही, असे खासदार राणे यांनी म्हटले.

उद्धव ठाकरे यांनी अडीच वर्षांच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात कोकणासाठी काय केले? कोकणातील किती लोकांना नोकऱ्या दिल्या, किती प्रकल्प आणले, किती पूल बांधले, असा सवालही या वेळी खासदार राणे यांनी उपस्थित केला.

### २१ जणांना गॅस्ट्रोची लागण; रुग्णालयात दाखल

यापैकी अंदाजे ३५ घरांना पाणीपुरवठा करणाऱ्या टाकीमध्ये कावळा तसेच इतर जीव मरून बरेच दिवस राहिल्याने पाण्यात अळ्या तयार झाल्या होत्या. त्यामुळे अनेकांना उलट्या, जुलाब सुरू झाले. यापैकी ११ रुग्णांवर कडाव प्राथमिक आरोग्य केंद्रात स्थानिक पातळीवर उपचार करण्यात आले, तर १० रुग्णांना कर्जत उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले होते. यापैकी सात रुग्णांना उपचार करून घरी पाठवण्यात येणार आहे, तर तीन रुग्णांवर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर आहे.

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीतून अजिवली येथे विकासकामांचा शुभारंभ

योगेश लहाने, ज्ञानेश्वर भागित, ओबीसी मोर्चा तालुकाध्यक्ष अप्पा भागित, माजी सदस्य एम.जे. माळी, संतोष पाटील, राजेश काठावले, कल्पेश गोजे, प्रसाद पाटील, प्रमिला पाटील, काशिनाथ जाधव, जतीन भागित, सिद्धेश भागित यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.




## महाराष्ट्र शासन

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

### निविदा सूचना क्रमांक ३२ सन २०२४-२०२५

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे **बी-१** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा / बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | रायगड जिल्हयातील श्रीवर्धन तालुक्यातील बोर्डी ठाणे उलवा रेवस रस्ता प्रामा ४ किमी ३०८/१०० मध्ये कार्ले नदीवर मोठ्या पुलाचे बांधकाम करणे | ६१७२५०४०/- | ३०९०००/- | ३५४०/- | १२ महिने | आवश्यकता नाही |
| २ | देहेन पाष्टी पांगळोली रस्ता प्रजिमा ७६ किमी ८/०० ते १६/०० मध्ये सुधारणा करणे ता श्रीवर्धन जि रायगड | १५१६१९५९/- | १५००००/- | ११८०/- | १२ महिने | आवश्यकता नाही |
| ३ | नेवरुळ कोकबन सांगवड रस्त प्रजिमा ७५ किमी ३/०० ते ६/०० मध्ये सुधारणा करणे ता म्हसळा जि रायगड | १०६३०७०५/- | १०७०००/- | ११८०/- | १२ महिने | वर्ग चार |
| ४ | म्हसळा कोंझरी रस्ता प्रजिमा ७३ किमी ६/५०० ते १०/०० मध्ये सुधारणा करणं ता म्हसळा जि रायगड | १०६२१७१८/- | १०७०००/- | ११८०/- | १२ महिने | वर्ग चार |

#### ई निविदेचे वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **२६/०८/२०२४** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **०२/०९/२०२४** वेळ १८.०० वाजेपर्यंत. |
| २ | निविदा पुर्व बैठक | मा. मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, कोकण मर्झबान रोड,फोर्ट मुंबई यांचे कार्यालयात दि. २८.०८.२०२४ रोजी दु. १२.०० वाजता (अ.क्र.१) करिता |
| | | अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दि. २८.०८.२०२४ रोजी दु. १५.०० वाजता (अ.क्र.२ करिता |
| ३ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार सउघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधीक्षक अभियंता,रायगड (सा.बां.) मंडळ , कोकण भवन नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक ०४/०९/२०२४ वेळ १२.०० वाजता |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धिपत्रके तसेच इतर काही दुरूस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/ ४०७३**
**दिनांक : २३/०८/२०२४**

**सही/**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

# पनवेलमध्ये ठिकठिकाणी गोपाळकाला उत्साहात

## भाजपच्या दहीहंडीने उलवे नोडमध्ये जल्लोष

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

भाजप आणि महिला मोर्चा उलवे नोड यांच्या वतीने भव्य दहीहंडी उत्सव माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली शानदार पद्धतीने झाला. ही हंडी फोडण्याचा मान मार्लेश्वर महिला मंडळ मुंबई आणि वडाळा येथील आई एकविरा मंडळ या पथकाला मिळाला असून त्यांना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरवण्यात आले.

या उत्सवाचे प्रमुख आकर्षण सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती ठरली असून तब्बल सहा लाख ६६ हजार ६६६ रुपयांची ही हंडी होती, मात्र त्याहून अधिक रकमेची पारितोषिके दानशूर लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गोविंदा पथकांना देऊन त्यांना प्रोत्साहित केले.

उलवे नोड सेक्टर ९ मधील खारकोपर तलावाच्या बाजूला असलेल्या मैदानात हा उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा झाला. या ठिकाणी अनेक पथकांनी मानवी मनोरे रचून सलामी दिली. या वेळी प्रत्येक सलामी दिलेल्या पथकांना मान्यवरांच्या हस्ते आकर्षक बक्षीसे देऊन गौरवण्यात आले. या दहीहंडी उत्सवामध्ये यंगस्टार म्युझिकलच्यावतीने सादर केलेल्या सांस्कृतीक कार्यक्रमाने अधिक रंगत आली. या वेळी महिलांच्या हंडीमध्ये मुंबईतील मार्लेश्वर महिला मंडळ तर पुरुषांच्या हंडीमध्ये वडाळा येथील आई एकविरा मंडळ या गोविंदा पथकाला ही हंडी फोडण्याचा मान मिळाला असून त्यांना बक्षीस आणि ट्रॉफी देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले.



या वेळी ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, पंछायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, योगिता भगत, कोळी समाजाचे नेते विश्वनाथ कोळी, वहाळ ग्रामपंचायतीचे तंटामुक्ती अध्यक्ष उत्तम कोळी, रतनशेठ भगत, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, हेमंत ठाकूर, तालुका चिटणीस जयवंत देशमुख, भाजपचे उलवे नोड १ चे अध्यक्ष निलेश खारकर, मदन पाटील, शैलेश भगत, साईचरण म्हात्रे, सुजाता पाटील, कामीनी कोळी, उषा देशमुख, निकिता खारकर, भार्गव ठाकूर, वहाळ ग्रामपंचायतीचे सदस्य वितेश पाटील, अंकुश ठाकूर आदी उपस्थित होते.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून गोविंदा पथकांना प्रोत्साहन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष खारघर मंडळ आणि शिवप्रतिष्ठाण सामाजिक संस्था खारघर, बेलपाड पुरस्कृत मानाची भव्य दहीहंडी उत्सव २०२४ मंगळवारी साजरा झाला. या दहीहंडी उत्सावाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन गोवींदा पथकांना प्रोत्साहित करुन नागरीकांना शुभेच्छा दिल्या तसेच या मानाची भव्य दहीहंडी उत्सवाचे उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे कौतुक केले.



या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, भाजपचे खारघर शहर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटिल, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक अभिमन्यु पाटिल, शत्रुघ्न काकड़े, नरेश ठाकुर, गुरुनाथ गायकर, माजी नगरसेविका नेत्रा पाटिल, अनिता पाटिल, आरती नवघरे, भाजप नेते वासुदेव पाटील, किरण पाटील, विजय पाटील, वनीता पाटिल, सरचिटणीस दीपक शिंदे, अमर उपाध्याय, किर्ती नवघरे, सनी नवघरे, ॲड. राजेंद्र अग्रवाल, उत्तर भारतीय मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संतोष शर्मा, गीता चौधरी, महिला मोर्चा अध्यक्षा साधना पवार, उपाध्यक्ष अंकिता वारंग, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश अभिमन्यू पाटील, सरचिटणीस अक्षय लोखंडे उपस्थित होते.

यासोबतच भरत कोंढाळकर, अशोक जांगीड, युवा मोर्चा उपाध्यक्ष प्रवीण बेरा, चिटणीस आदित्य हातगे, जयदीप गिरासे, सनी नवघरे, प्रथम पाटील, सीमा खडसे, दीपक ठाकुर, निर्मला यादव, शोभा मिश्रा, प्रिया दलवी, भाग्यश्री खरपुरिया, स्मिता आचार्य, सुशीला शर्मा, गायत्री महापात्रा, जुमा चक्रवर्ती, मधुमिता जेना, सिमा मजूमदार यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## कामोठ्यात भव्य दहीहंडी उत्सव





**कामोठे : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष कामोठे मंडळ आणि प्रदीप भगत युवा मंचच्या वतीने भव्य दहीहंडी उत्सवांचे आयोजन मंगळवारी (दि. २७) केले होते.

कामोठे परिसरातील सर्वांत मोठ्या दहीहंडीचे आयोजन भाजपच्या वतीने करण्यात आले होते, तर प्रदीप भगत युवा मंचच्या वतीने आयोजित केलेल्या दहीहंडी उत्सवात सहा लाख ६६ हजार ६६६ रुपयांची पारितोषके ठेवण्यात आली होती. या दोन्ही उत्सवांना पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत सर्वांना शुभेच्छा दिल्या तसेच सलामी दिलेल्या पथकांना बक्षीस देउन सन्मानित केले.

या वेळी भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगरसेवक विजय चिपळेकर, विकास घरत, माजी नगरसेविका अरुणा भगत, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप भगत, युवा मोर्चा कामोठे मंडळ अध्यक्ष तेजस जाधव यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.



**नवीन पनवेल : येथील सीकेटी विद्यालयाच्या आवारात साईतेज प्रतिष्ठान आयोजित आमदार चषक दहीहंडी उत्सवाचा थरार मंगळवारी पहायला मिळाला. दरवर्षी माजी नगरसेवक तेजस कांडपिळे यांच्या आयोजनातून साकारण्यात येणारा या उत्सवाला अनेक गोविंदा पथकांनी भेट देत सलामी दिली. तान्हाजी चित्रपटामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारणारे सुप्रसिद्ध सिनेकलाकार शरद केळकर यांनी उपस्थिती ही या दहीहंडी उत्सवाचे मुख्या आकर्षण ठरले. दरम्यान, आमदार प्रशांत ठाकूर यांनी या उत्सवाला भेट देऊन उत्कृष्ट आयोजनाचे कौतुक केले. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस चारुशीला घरत, संजय भगत आदी उपस्थित होते.**



**पनवेल : नावडे फेज २मध्ये मैत्री प्रतिष्ठानच्या वतीने दहीहंडी उत्सव आयोजित करण्यात आला होता. या उत्सवाला आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देऊन सर्व गोविंदा पथक आणि नागरिकांना गोपाळकाल्याच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी सचिन म्हात्रे, मदन खानावकर, मैत्री प्रतिष्ठानचे जितेंद्र काटकर आदी उपस्थित होते.**





**पनवेल : येथील नैवेद्य सोसायटीमध्ये कृष्ण जन्मोत्सव व दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी नैवेद्य सोसायटीतील महिला भगिनी व बालगोपाळ उपस्थित होते.**

## आमदार महेश बालदींनी घेतली पिरकोन गावची आढावा बैठक

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरणचे आमदार महेश बालदी यांनी नुकतीच उरण तालुका उपाध्यक्ष भाजप मुकुंद गावंड यांच्या निवासस्थानी पिरकोन गावाची आढावा बैठक घेतली.

यामध्ये आमदार महेश बालदी यांनी सर्व कार्यकर्त्यांची विचारपूस केली. त्यांचे स्वागत भाजप ज्येष्ठ कार्यकर्ते मंगेश गावंड, काशिनाथ म्हात्रे आणि गणेश म्हात्रे या जेष्ठांनी साहेबांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

या बैठकीला उरण तालुका अध्यक्ष रवी भोई, मुकुंद गावंड, माजी जिल्हा परिषद सदस्य जीवन गावंड, उरण पूर्वविभाग अध्यक्ष शशिकांत पाटील, उद्योजक देवेंद्र पाटील, युवा नेते करण ठाकूर, स्वीय सहाय्यक निखिल माळी, ज्येष्ठ नेते सुनील पाटील आणि पिरकोन गावातील सर्व पदाधिकारी, शिक्षक नेते व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.



## छत्रपती शिवाजी कॉलेज येथे अतिथी सत्र

### 'सीकेटी'च्या डॉ.परकाळे यांनी केले मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे अग्रगण्य महाविद्यालय असणाऱ्या छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथे इंग्रजी विभागाकडून अतिथी सत्राचे यशस्वी आयोजन करण्यात आले. चांगू कांना ठाकूर (सीकेटी) आट्‌र्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज नवीन पनवेलच्या इंग्रजी विभाग व छत्रपती शिवाजी कॉलेजच्या इंग्रजी विभागाच्या फॅकल्टी स्टुडन्ट एक्सचेंज अंतर्गत (एमओयू) या अतिथी सत्राचे आयोजन करण्यात आले.



या सत्रासाठी डॉ. सूर्यकांत परकाळे यांना आमंत्रित करण्यात आले होते, त्यांनी आपल्या व्याख्यानात इंग्रजी भाषेचे महत्त्व वेगवेगळ्या व्यावसायिक व रोजगारांच्या संधी या विषयावरती विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले त्यावेळी त्यांनी रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मविभूषण, शिक्षणसम्राट डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील व रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक कार्याबद्दल माहिती दिली त्याचबरोबर इंग्रजी भाषा ही व्यावहारिक भाषा तर आहेच त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी ती अवगत केली तर त्यांना करिअरच्या वेगवेगळ्या संधी उपलब्ध होतात, असे सांगितले.

पुढे जाऊन त्यांनी रयत शिक्षण संस्था बरोबरच जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थचे सीकेटी महाविद्यालय व इंग्रजी विभाग यांच्याकडून विद्यार्थी केंद्री घेतल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या उपक्रमांचा उल्लेख केला सीकेटीचा इंग्रजी विभाग हा नेहमी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवण्यामध्ये अग्रेसर असतो, असे विद्यार्थ्यांना सांगितले.

व्याख्यानावेळी छत्रपती शिवाजी महाविद्यालय सातारा उपप्राचार्य व विभाग प्रमुख डॉ. रोशनरा शेख, प्रो. देवकुळे, प्रो. तांबिले, प्रो. कांगुने प्रा. महाजन उपस्थित होते. फॅकल्टी अँड स्टूडेंट एक्सचेंज प्रोग्रॅम अंतर्गत घेण्यात आलेल्या अतिथी सत्रा साठी सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस.के. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले व इंग्रजी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. राजेश येवले यांनी पुढाकार घेतला.

## अजित रोकडे यांची नियुक्ती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अखिल भारतीय एससी एसटी व्हीजे डीटी एनटी ओबीसी एसबीसी अल्पसंख्याक कर्मचारी महासंघाच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी अजित दशरथ रोकडे यांनी नियुक्ती करण्यात आली आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे. एकूण १३ विविध प्रकारच्या असोसिएशन तसेच फेडरेशनच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



महिलांच्या सुरक्षेसाठी तसेच त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारांच्या विरोधात सक्षमपणे खंबीर नेतृत्व करण्यासाठी, बेरोजगारांसाठी रोजगार, शेतकरयांना योग्य हमीभाव, कष्टकरी कामगारांना योग्य सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कायम प्रयत्नशील राहण्याची संविधानाची निर्मिती करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होऊन कायम सदैव लोकसेवा करण्याकरीता उपलब्ध राहण्याची आश्वासन आणि ग्वाही देत रोकडे यांनी पदभार स्वीकारला आहे.

## उलवे नोडमधील रस्त्यांची सिडकोकडून पाहणी

### ✻ भाजप पदाधिकाऱ्यांचा पाठपुरावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गणपती अगोदर उलवे नोडमधील रस्ते दुरुस्ती करून द्या, नाहीतर सिडकोला टाळे ठोक आंदोलन करणार असा इशारा भाजप पदाधिकाऱ्यांनी दिला होता. त्यानुसार सिडकोच्या अधिकाऱ्यांनी बामणडोंगरी गावातील रस्त्यांची पाहणी केली.

या वेळी सिडको इंजिनियर वाळिंबे, देशमुख साहेब आले होते. वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, अवधेश महतो, अमित नाईक, नामदेव ठाकूर, प्रवीण ठाकूर, प्रिया आडसुळे, सुहास गोंधळी, दीपक गोंधळी पाहणी दौऱ्यात समाविष्ट होते.

या विषयाबरोबरच बामणडोंगरी गावासाठी आरक्षित समाज मंदिरांचा लवकरात लवकर टेंडर व्हावा, जिल्हा परिषद शाळा प्लॉट संदर्भात निर्णय करावा, अशी चर्चा झाली.



## संपादकीय


# विरोधकांना आयते कोलित

छत्रपती शिवाजी महाराजांचा मालवणच्या राजकोट किल्ल्यावरील पूर्णाकृती पुतळा कोसळण्याची दुर्दैवी घटना सोमवारी घडली. या घटनेचे दुःख महाराष्ट्रातील प्रत्येक शिवप्रेमी नागरिकाला स्वाभाविकपणे वाटते आहे, परंतु या अपघाती घटनेवरून राज्यातील महायुती सरकारविरोधात तसेच केंद्राच्या विरोधात विरोधकांनी जी टीकेची झोड उठवली आहे, तो मात्र मिळेल त्या घटनेतून आपले राजकारण साधून घेण्याचा प्रयत्नच म्हणावा लागेल.

**अवघ्या आठ महिन्यांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अनावरण झालेला, छत्रपती शिवरायांचा मालवणच्या राजकोट किल्ल्यावरील ३५ फुटी पुतळा मुळात नौदलाने बसवलेला होता. ४५ किमी वेगाच्या वाऱ्याच्या माऱ्याला तो तोंड देऊ शकला नाही ही अतिशय खेदाचीच बाब आहे. हा पुतळा नौदलाच्या अखत्यारीत येतो असा खुलासा प्रारंभीच करण्यात आला होता. ४ डिसेंबर २०२३ रोजी नौदल दिनी सिंधुदुर्गवासियांना अर्पण केलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा अशारीतीने कोसळल्याबद्दल आम्हाला अतीव दुःख आहे. राज्य सरकार, संबंधित तज्ज्ञमंडळी आणि नौदलातील अधिकाऱ्यांचे पथक तातडीने या दुर्घटनेचे कारण शोधण्याचे काम सुरू करेल असा खुलासा भारतीय नौदलाने दुर्घटनेनंतर लागलीच केला होता. राज्य सरकारनेही दोषींवर कारवाई करून त्याच ठिकाणी नवा पुतळा उभारण्याची ग्वाही दिली, परंतु सत्ताधारी पक्षांविरोधात कुठलेच मुद्दे सापडत नसल्याने गोंधळलेल्या विरोधकांना या घटनेमुळे आयतेच कोलित मिळाले असून ते सत्ताधाऱ्यांवर कुठलाही पुरावा नसताना वाट्टेल ते आरोप करत सुटले आहेत. ठाकरे गटाचे आमदार वैभव नाईक यांनी तर लागलीच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाची मोडतोड केली, तर त्यांच्या पक्षाचे प्रवक्ते थेट मुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहेत, याला काय म्हणावे? विधानसभा निवडणुका तोंडावर आल्यामुळे विरोधकांना मिळेल त्या मुद्यावरून आपले राजकारण साधायचे आहे हे जनता मात्र ओळखून आहे. राज्य सरकारने या प्रकरणाची नीट चौकशी सुरू केली असून पुतळ्याची उभारणी करणाऱ्या आणि देखरेख करणाऱ्या संबंधित कंत्राटदारांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुतळा उभारणीचे काम मेसर्स आर्टिस्ट्री नावाच्या कंपनीला देण्यात आले होते. जयदीप आपटे हे या कंपनीचे प्रोप्रायटर असून त्यांनी हा पुतळा बनवला आहे. चेतन पाटील यांनी या प्रकल्पाचे स्ट्रक्चरल कन्सल्टंट म्हणून काम पाहिले. समुद्रकिनारी असलेल्या शिवरायांच्या या पुतळ्याला गंज लागल्याचे निदर्शनास आल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने अलीकडेच नौदलाला पत्र पाठवून ते त्यांच्या निदर्शनास आणून दिले होते असेही समजते. पुतळ्याच्या कामात हलगर्जी केल्याप्रकरणी शिल्पकार जयदीप आपटे आणि बांधकाम सल्लागार चेतन पाटील यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा प्रयत्न आणि शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जयदीप आपटे फरार असल्याचे सांगितले जात असून अवघ्या २५ वर्षे वयाच्या कल्याण येथे राहणाऱ्या या शिल्पकाराच्या अपुऱ्या अनुभवाबद्दल टीका होते आहे. पुतळा उभारण्याचे काम नौदलाने जयदीप आपटेला दिले होते हे लक्षात घेतले पाहिजे. नौदलाकडून यासंदर्भात पारदर्शकपणे सारी माहिती उजेडात यायला हवी. इतक्या मोठ्या पुतळ्याची शिल्पकला ही बरीचशी अभियांत्रिकी प्रक्रियांवरही अवलंबून असते. तेव्हा नेमका हलगर्जीपणा कुठे झाला हे स्पष्ट व्हावे लागेल. दरम्यान, शिवरायांविषयी कृतीशील सन्मान बाळगून या दुर्दैवी घटनेचे राजकीय हेतूंनी भांडवल करण्याचे विरोधकांनी टाळले तर बरे होईल.**

# रायगडात दहीहंडी उत्सव जल्लोषात

**रायगड जिल्ह्यात मंगळवारी (दि.२७) दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा झाला. गावागावात तीन ते पाच थरांच्या हदीहंड्या पहायला मिळाल्या, तर शहराठिकाणी राजकीय नेत्यांची पुरस्कृत केलेल्या लाखोंच्या बक्षिसांचे दहीहंडीचे लोणी चाखण्यासाठी गोविंदा पथकांच्या थराराची कसरत अनुभवायला मिळाली.**



**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानमध्ये श्रीकृष्णजन्म, दहीकाला पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. श्रीराम मंदिर परिसरात रात्रीपासून भजनाच्या भक्तिरसात सारा आसमंत न्हाऊन निघाला. येथे भजन मंडळींनी अभंगांची उधळण करीत श्रीकृष्णजन्म साजरा केला.

पर्यटकांनीसुद्धा माथेरानमधील पारंपरिक गोकुळाष्टमीचा आनंद घेत दर्शनासाठी श्रीराम मंदिरात गर्दी केली होती, तसेच अनेक गुजराती पर्यटकांनी मंदिर परिसरात गरबा नृत्यदेखील सादर केले.

मंगळवारी दुपारी पुन्हा श्रीराम मंदिरात कार्यक्रमांना सुरुवात झाली. मंदिरातील सुश्राव्य भजन आटोपल्यानंतर ग्रामस्थ उत्सव मंडळाकडून मानाची दहीहंडी छोट्या बाळगोपाळांकडून फोडण्यात आली. त्यानंतर येथील सर्व मंडळांकडून दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम सुरू झाला.

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा शहरातील पारंपरिक दहीहंडी उत्सवाला प्रोत्साहन देण्यासाठी भारतीय जनता पक्ष व भारतीय जनता युवा मोर्चाकडून रोहा शहरात दहीहंडीचे आयोजन केले होते.

धनगरआळी, अंधारआळी, मोरेआळी या गोविंदा पथकास रोहातील छत्रपती संभाजी महाराज चौक (तीनबत्ती नाका) येथे हंडी फोडण्यासाठी नियोजन करण्यात आले होते, तसेच अष्टमी व दमखाडी, हनुमाननगर येथेसुद्धा नियोजन करण्यात आले. या वेळी रोख रक्कम ११ हजार व चषक देण्यात आले. ब्राह्मणआळी गोविंदा पथकाचा यथोचित सन्मान केला.

या वेळी भाजप रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग, भाजप रोहा शहराध्यक्ष यज्ञेश भांड, युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस रोशन चाफेकर, सरचिटणीस कृष्णा बामणे, युवा मोर्चा जिल्हा चिटणीस नरेश कोकरे, युवा वॉरिअर जिल्हा संयोजक वैभव कुळकर्णी, तालुका चिटणीस शैलेश रावकर, युवा मोर्चा रोहा शहराध्यक्ष अनिल घरजाळे, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस निलेश धुमाळ, सुमित रिसबूड, परेश चितळकर व आदर्श गायकवाड, राकेश गुंदेशा इतर सर्व कार्यकर्त्यांनी सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

कार्यक्रमास पोलीस निरीक्षक देविदास मुपडे, भाजप जिल्हा चिटणीस श्रद्धा घाग, महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस जयश्री भांड, संस्कृती ओक, सागर ओक, योगेश तेंडुलकर यांची उपस्थिती लाभली, तसेच ज्येष्ठ कार्यकर्ते विनायक बेडेकर, नितीन तेंडुलकर, वसंत शेलार यांचे उपस्थिती व मार्गदर्शन लाभले.





**माणगाव : येथील नगरसेविका ममता थोरे यांनी नगरपंचायत हद्दीतील गिरीजनवाडी शाळेतील विद्यार्थ्यांसमवेत दहीहंडी उत्सव साजरा केला.** (छाया : सलीम शेख)

**पोलादपूर : प्रतिनिधी**

शहरातील ग्रामदैवत श्री काळभैरवनाथ जोगेश्वरी देवस्थान ट्रस्टकडे परंपरेनुसार दहिहंडीचे सर्व हक्क असून त्यामुळे उत्सवाला कधीही गालबोट लागत नसल्याची तसेच सुरक्षिततेचीही परंपरा गेल्या अनेक वर्षांपासून कायम आहे. यंदाही १२ नगरांसह एक महिला मंडळाच्या गोविंदा पथकांनी तब्बल २५ दहीहंड्या फोडल्या.

दरवर्षीप्रमाणे श्रीकाळभैरवनाथ मंदिरामधील दहीहंडी फोडून गोविंदा पोलादपूर शहरात निघतात. यासाठी ४१ जणांची एक दक्षता कमिटी आणि ४५ जणांची गोविंदा उत्सव पंच कमिटीची निवड करण्यात आली. अध्यक्षांची दहीहंडी सणापुरते निवड करण्यात आली आहे, अशी माहिती देवस्थानचे सरपंच बाबूराव महाडीक यांनी एका पत्रकाद्वारे दिली.



जाखमातानगर, सैनिक नगर, गोकुळनगर, साईनाथनगर, तांबडभुवन, तांबडभुवन मित्र मंडळ, जोगेश्वरी गाडीतळ, शिवाजीनगर, सिद्धेश्वरआळी, स्वामी परमानंद मठगल्ली, आनंदनगर, भैरवनाथनगर आणि काळभैरवनाथनगर अशा १२ नगरांनी पोलादपूर शहरातील २३ दहीहंड्या आणि महिला मंडळाने भैरवनाथनगर आणि प्रशांत शेठ यांची दहीहंडी फोडण्याचे नियोजन करण्यात आल्यानुसार त्या-त्या नगरांतील गोविंदांनी दहीहंड्या फोडल्या.

या पारंपरिक दहिहंडी उत्सवामुळे शहरामध्ये कोणतीही वेगळी बक्षिसे आणि उंचीची चढाओढ आजपर्यंत आयोजित करण्यात आलेली नाही. परिणामी, शहरातील सर्व नगरे एकोप्याने एकमेकांच्या गोपाळकाल्यामध्ये सहभागी होऊन हंड्या फोडतानाचे दरवर्षीचे दृश्य निश्चितच आनंददायी असते, असे मत ग्रामदैवत श्रीकाळभैरवनाथ जोगेश्वरी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष बाबूराव महाडीक यांनी व्यक्त केले.

**सुधागड : रामप्रहर वृत्त**



सुधागड तालुक्यात मंगळवारी (दि.२७) पाली, जांभूळपाडा, परळी, पेडली आदी सर्वच ठिकाणी दहीहंडीची धूम पहायला मिळाली. पारंपरिक पद्धतीने तसेच पारंपारिक पेहराव व पारंपरिक वाद्यांच्या चालीवर गोपाळकाला उत्सव साजरा करण्यात आला.

विशेष म्हणजे जांभूळपाडा येथील अनोखी प्रथा आहे. गोविंदाच्या अंगावर आसुडाचे (सोरट) फटके मारत दहीहंडी फोडली जाते.

यंदा गोपाळकल्याला पावसाने हजेरी लावल्याने दहीहंडीचा उत्साह द्विगुणित झाला. दहीहंडी एकावर एक थर लावून फोडतांना वरून पावसाच्या सरी अंगावर आल्यातर सर्वांना सुखद गारवा मिळतो. दहीहंडी साजरी करण्याच्या वेगवेगळ्या पद्धती आणि रिती आहेत. तालुक्यातील जांभूळपाडा येथे अशा प्रथेतून दहीहंडी साजरी केली जाते. येथे गोविंदांच्या अंगात कान्होबाचे वारे येते आणि हे सर्वजण घुमायला सुरुवात करतात.

महिला त्यांची पूजा-अर्चा करतात आणि मग गोविंदा आसुडाचे फटके अंगावर मारून घेत गावभर फिरतात. ही परंपरा केव्हापासून सुरू झाली हे सांगता येत नाही, मात्र मागील कित्येक वर्षांपासूनची ही परंपरा ग्रामस्थांनी आजही जपली आहे.





**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव येथील शिवसमर्थ मित्रमंडळ कुंभारवाडा गोविंदा पथक यांनी सालाबादप्रमाणे यावर्षीही दहीकाला सण उत्साहात साजरा केला. या मंडळाच्या दहीहंडी उत्सवात गोविंदा मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

मंडळाने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही भैरी मंदिरापासून दहीहंडी उत्सवाला सुरुवात केली. जुने माणगावात ठिकठिकाणी बांधण्यात आलेल्या दहीहंड्या मानवी मनोरे रचत शिवसमर्थ मित्रमंडळ कुंभारवाडा गोविंदा पथकाने फोडल्या. या मंडळाच्या दहीहंडी उत्सवात येथील नगरसेवक दिनेश रातवडकर यांनी दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सहभागी होऊन त्यांनी गोविंदा पथकाचा उत्साह वाढविला. या गोविंदा पथकाने नगरसेवक दिनेश रातवडकर यांच्या नावाचे बनियान परिधान केले होते.

**रोहे : प्रतिनिधी**

सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान व राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने शहरातील कुंडलिका नदी संवर्धन पार्किंग येथे भव्य दहीहंडी स्पर्धेतील थरार हजारो रोहेकरांनी पाहिला. पावसात ओलेचिंब होत डीजेच्या तालावर गोविंदा पथकातील गोविंदा थिरकताना दिसले. काही गोविंद पथकांनी संदेशाचे फलक हाती घेतले होते. या वेळी महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनीही महिलांसोबत ठेका धरला.

या वेळी खासदार सुनील तटकरे, महिला व बाल कल्याण मंत्री आदिती तटकरे व माजी आमदार अनिकेत तटकरे, राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, रायगड जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर, पोलीस निरीक्षक देवीदास मुपडे, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, वेदांती तटकरे आदी उपस्थित होते. स्पर्धेत महिलांचा सहभाग आकर्षणाचा बिंदू ठरला.



जिल्ह्यातील ४० गोविंद पथकांनी स्पर्धेत सहभाग घेतला होता. या वेळी सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी रोहेकरांना पहावयास मिळाला. गोविंदांच्या सुरक्षेची खबरदारी यावेळी घेण्यात आली होती. स्पर्धेच्या ठिकाणी वैद्यकीय पथक तैनात करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन स्वतः माजी आमदार अनिकेत तटकरे करीत होते. रात्री उशिरापर्यंत गोविंद पथकांचा थरार सुरू होता.



**दरवर्षी महिला पथकांचा सहभाग वाढत आहे. या महिला मुख्यमंत्र्यांची लाडकी बहीण म्हणून ओळखल्या जातात. त्याचप्रमाणे खासदार सुनील तटकरे यांच्या माध्यमातून महिलांसाठी विविध उपक्रम राबविण्यात आले आहे. त्यामुळे रोहेकरांचा उत्साह आमच्यासाठी आनंददायी ठरत आहे.**

**-आदिती तटकरे, मंत्री, महिला व बालकल्याण**

**कर्जत : प्रतिनिधी**

गेली ९१ वर्षांपासून कृष्णजन्माष्टमीचा उत्सव राऊत कुटुंबीय गुण्यागोविंदाने आणि मोठ्या उत्साहात साजरा करतात. आज या उत्सवात त्यांची चौथी पिढी सहभागी झाली आहे. तालुक्यातील भिसेगाव येथील निशिकांत राऊत यांच्या घरी दरवर्षी हा उत्सव कृष्णजन्माष्टमीच्या दिवशी साजरा केला जातो. या उत्सवाला गावातील व परिसरातील बाळगोपाळ, तरुण मंडळी, महिला वर्ग व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने हजेरी लावली होती.

या गोपाळकाला उत्सवाबाबत गावातील ज्येष्ठ मंडळींच्या माहितीनुसार आणि राऊत कुटुंबियांच्या घरातील सुशीला महादू राऊत यांच्या म्हणण्यानुसार, त्या या घरात सून म्हणून येण्यापूर्वीपासून हा उत्सव होत असल्याचे सांगतात. त्यांचे सासरे स्व. गोपाळ वाळकू राऊत हे गणेश उत्सवात आपल्या घरगुती गणपतीचे विसर्जन उल्हासनदीच्या पात्रात केल्यानंतर मुठभर वाळू काढण्यासाठी नदीच्या पात्रात हात टाकला असता त्यांच्या हातात एक सुंदर आशी सुबक बाळकृष्णाची मूर्ती सापडली. त्यांनी ती मूर्ती घरी आणून देवघरात ठेऊन पूजाविधी केली आणि त्यानंतर पुढे कृष्ण जन्माष्टमिचा उत्सव सुरू झाला. या उत्सवाला ९१ वर्षे पूर्ण होत असल्याचे चंद्रकांत राऊत यांनी सांगितले.



जन्माष्टमिच्या दिवशी नदीच्या पात्रात सापडलेल्या कृष्णमूर्तीची पूजाविधी केली जाते आणि रात्री १२ वाजता ती मूर्ती पाळण्यात ठेऊन पाळणा म्हटला जातो. गावातील सर्व मंडळी उत्सवाला हजेरी लावतात. दिवसभर भजन हरिपाठ व रात्री आरती झाल्यावर बाळकृष्णाचा पाळणा सादर केला जातो. या वेळी गोपाळकृष्ण महाराजांचा जयघोष करीत दही-पोह्यांची उधळण करून सुंठवड्याचा प्रसाद वाटला जातो.

या उत्सवाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे गावातील व परिसरातील नवोदित दांपत्य अपत्य लाभासाठी बाळकृष्णाचे दर्शन घेतल्यानंतर पाळणा हलविण्याची प्रथा आजही कायम आहे. त्यामुळे या उत्सवात बाळगोपाळ कृष्णाला पाळण्यात ठेवल्यानंतर नवोदित दांपत्य पाळणा हलविण्यासाठी गर्दी करतात. उत्सवाच्या दुसऱ्या दिवशी महाप्रसाद घेतल्यानंतर मानाची दहीहंडी फोडली जाते. त्यानंतर गावातील बाळगोपाळ उर्वरित हंड्या फोडतात.

**रोहे : प्रतिनिधी**

शहरातील विविध आळीतून लहान मुलांसह तरुण पारंपरिक खालु बाजा व विविध वाद्यवृंदावर ठेका धरताना दिसून आले. मोरे अळी, अंधार आळी, धनगर आळी, दमखाडी, हनुमान नगर, ब्राह्मण आळी या ठिकाणी दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करताना दिसून आले. काही ठिकाणी दहीहंडीला महिला पथकांनी सलामी दिली आहे. महिला पथकांचे सर्वांनी टाळी वाजून दाद दिले.

सातत्याने वरूण राजाची हजेरी लागत होती. सायंकाळी ३ वा.च्या सुमारास आळीपाळीने गोविंदा पथक रोहा बाजारपेठेत दहीहंडी फोडण्यास येण्यास सुरुवात झाली. राम मारुती चौकात रोटरी क्लब ऑफ रोहा सेंट्रल व रोट्रॅक्ट क्लब ऑफ रोहा सेंट्रल यांच्या वतीने दहीहंडी बांधण्यात आली होती. यावर्षी आपले सण आपली संस्कृती आपला गोविंद सुरक्षित गोविंदा ही संकल्पना राबविण्यात आले होते.



भाजप व भाजपयुमो रोहाच्या वतीने तीनबत्ती नाका येथे महाराष्ट्राचा सर्वांगिण विकास या संकल्पनेतून दहीहंडी बांधण्यात आली होती. रात्री उशीरापर्यंत शहरातील गोविंद पथकाकडून दहीहंडी फोडण्यात आली.

# पनवेल महानगरपालिका
## वैद्यकीय आरोग्य विभाग

**कार्यालय : देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल ४१०२०६**


दुरध्वनी कार्यालय : 022- 27458040/41/42 | फॅक्स नं. : 022- 27452233
वैद्यकीय आरोग्य विभाग : 022 – 27455751 | आयुक्त कार्यालय : 022- 27452339
ई-मेल : mohpmc05@gmail.com | वेबसाईट: www.panvelcorporation.com


**जा.क्र./पमपा/वै.आ.वि/ ४३४० /सन २०२४-२५** | **दिनांक:- २८ /०८/२०२४**

## पदभरती जाहिरात

वाचा :- १. मंजुर प्रकल्प अंमलबजावणी आराखडा सन २०२४-२५ नुसार मंजुर पदे
२. मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे जा. क्रं.राआसो/मनुष्यबळ कक्ष/सुधारित पदभरती समिती / १०२६६-१०६००/२०२३ दि.२६.०४.२०२३ रोजीचे पत्र
३. मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे जा.क्रं.राआसोमुं/मनुष्यबळ कक्ष/पदभरती / १०६७०-११०१६/२०२३ दि.२७.०४.२०२३ रोजीचे पत्र.
४. सहाय्यक संचालक राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांचे जा.क्र. रानाआअ / शैक्षणिक पात्रता/ एनयुएचएम/२४००४-२४१८७/२३ दि २४.०५.२०२३ रोजीचे पत्र.
५. शासन निर्णय क्र. बीसीसी-२०२४/प्र. क्र.७५/१६- क दि. २७/०२/२०२४
६. मा. सहसंचालक (अतांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचेकडील पत्र जा.क्र. राआसोमुं / मनुष्यबळ / कं. भरती/२७४१५-६६३/२०२४ दि.३.०७.२०२४
५. मा. आयुक्त महोद्यांची मंजुरी टिपणी दि. २६.०८.२०२४

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान व १५ वा वित्त आयोग अंतर्गत, पनवेल महानगरपालिकेकरिता रिक्त असलेल्या पदांवर खालील दर्शविल्याप्रमाणे निव्वळ कंत्राटी स्वरूपात करार पध्दतीने मानधन तत्वावर नियुक्ती करावयाची आहे. त्यासाठी पदभरती प्रक्रियेद्वारे इच्छुक व पात्र उमेदवारांच्या नेमणुका पनवेल महानगरपालिका यांच्या स्तरावरून गठीत केलेल्या समितीमार्फत थेट मुलाखतीद्वारे करण्यात येणार आहेत. यासाठी बुधवार दि.०४.०९.२०२४ रोजी दुपारी २.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेमध्ये थेट मुलाखती आयोजित करण्यात येत आहेत. सदर पदांसाठी अर्जाचा विहित नमुना पनवेल महानगरपालिकेच्या या www.panvelcorporation.com संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**तरी इच्छुक व पात्र उमेदवारांनी वरील प्रमाणे मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.**

| अ. क्र | पदाचे नाव | कार्यक्रम | रिक्त पदे | आरक्षणा नुसार जात प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुर्णवेळ वैदयकीय अधिकारी | राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान | ०५ | तात्पुरत्या स्वरूपात | MBBS with MMC Reg Preference will be given to experienced person | उच्चतम वयोमर्यादा ७० वर्ष | रूपये ६०,०००/- प्रतिमहा |
| | अर्धवेळ वैदयकीय अधिकारी | राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान | ११ | आरक्षण लागु नाही | MBBS with MMC Reg Preference will be given to experienced person | उच्चतम वयोमर्यादा ७० वर्ष | रूपये ६०,०००/- प्रतिमहा |
| | वैदयकीय अधिकारी | १५ वा वित्त आयोग कार्यक्रम | ०३ | तात्पुरत्या स्वरूपात | MBBS with MMC Reg Preference will be given to experienced person | उच्चतम वयोमर्यादा ७० वर्ष | रूपये ६०,०००/- प्रतिमहा |
| | मानसोपचार तज्ञ Psychiastrist | पॉलिक्लिनिक अंतर्गत | ०२ | आरक्षण लागु नाही | 1) MBBS with MD Psychiatry/DPM/DNB 2) Maharashtra Medical Council Registration (Preference will be given to experienced Candidates) | उच्चतम वयोमर्यादा ७० वर्ष | To visit once in every fortnight. Rs.2000 to be paid as fixed amount per visit + Rs. 100 per patient checked his/her specialty, maximum to Rs.५०००/ per visit (१ वर्षासाठी मानसोपचार तज्ञ - २६ भेटी व कान-नाक- घसा तज्ञ - २५ भेटी) |
| | कान - नाक घसा तज्ञ ENTSpecialist | पॉलिक्लिनिक अंतर्गत | ०१ | आरक्षण लागु नाही | 1) MS ENT/DORL/ DNB 2) Maharashtra Medical Council Registration (Preference will be given to experienced Candidates) | उच्चतम वयोमर्यादा ७० वर्ष | |

अर्जदाराच्या वरील मुलाखती नंतर निवड सुचीमधील पात्र उमेदवारांना गुणवत्तेनुसार नियुक्त्या दिल्या जातील व उर्वरीत पात्र उमेदवारांची प्रतिक्षायादी ठेवण्यात यईल. भविष्यात रिक्त होणाऱ्या पदावर या प्रतिक्षायादी मधील उमेदवारामधुन गुणवत्ता यादी प्रमाणे उमेदवारास नियुक्ती दिली जाईल.

**अर्जदाराची वयोमर्यादा-**

१. अर्ज भरण्याच्या दिनांकास उमेदवाराचे वय जाहिरातीमध्ये विहित केलेल्या वयोमर्यादेत असणे आवश्यक आहे.
२. मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे दि. २५ मे २०१९ रोजीच्या पत्रानुसार वैद्यकीय अधिकारी (MBBS), विशेषतज्ञ, अतिविशेषतज्ञ यांची वयोमर्यादा ७० वर्ष राहील. वयाच्या ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कडुन प्राप्त केलेले शारिरीक दृष्ट्या व मानसिक दृष्ट्या सक्षम असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

**अर्ज भरण्या बाबतच्या सुचना-**

१. उमेदवाराने स्वतःचे पूर्ण नाव माध्यमिक शाळा प्रमाणपत्राप्रमाणे अचूकपणे नोंदवावे. अर्जासोबत माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्राची प्रत जोडावी.
२. माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली जन्मतारीख अर्जात नमूद करावी.
३. जाहिरात प्रसिध्द केलेल्या दिनांकापर्यंत असणारे उमेदवाराचे वय (दिवस, महिने व वर्ष) अचूक नमुद करावे.
४. अर्जात उमेदवाराचे लिंग व वैवाहिक दर्जा या बाबतची माहिती नमूद करावी.
५. महिला अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र (Marriage Certificate) तसेच नावात बदल असल्यास (Govt. Gazette) अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.
६. अर्जामध्ये उमेदवाराने स्वतःच्या वैध ई-मेल आयडी/पर्यायी ई-मेल आयडी, चालू भ्रमणध्वनीचा क्रमांक/पर्यायी भ्रमणध्वनीचा क्रमांक नमूद करणे बंधनकारक आहे.
७. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी आहे किंवा कसे हे नमूद करणे आवश्यक आहे, असल्यास त्याबाबतचे विहीत प्रमाणपत्र (Domicile Certificate) अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.
८. उमेदवाराने अर्जामध्ये आपला जात, धर्म हा तपशील अचूकपणे नमूद करावा.
९. इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, विशेष मागास प्रवर्ग, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गात मोडणाऱ्या उमेदवारांनी नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
१०. अर्जदाराने आपला सध्याचा पत्ता व कायम स्वरूपी पत्ता अर्जामध्ये अचूक नमूद करावा.
११. अर्जदाराविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा, याबाबतचे हमी पत्र देण्यात यावे.
१२. अर्ज विहित नमुन्यात टंकलिखीत / स्वहस्ताक्षरात सर्व दृष्टीने पुर्ण असावेत. विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**शैक्षणिक अर्हता/पात्रता-**

१. शैक्षणिक अर्हतेबाबतचा सविस्तर व अचूक तपशील नोंद करावा.
२. उमेदवाराकडे जाहिराती मध्ये नमुद केलेली शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक आहे.
३. अर्ज भरत असताना पात्रता परिक्षेत अंतिम वर्षात मिळालेले गुण व गुणांची टक्केवारी अचूकपणे नमूद करावी. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमूद न करता गुण व गुणांची टक्केवारी नमूद करणे अनिवार्य आहे. प्रमाणपत्रात नमूद गुण व गुणांची टक्केवारी, अर्जातील नमुद टक्केवारीसह न जुळल्यास, असे अर्ज नामंजूर करण्यात येतील.
४. उमेदवारांनी मुलाखतीवेळी आवश्यक असलेल्या शैक्षणिक अर्हतेच्या मूळ गुणपत्रिका व इतर आवश्यक ती प्रमाणपत्रे सादर न केल्यास सदरील उमेदवारांना अपात्र ठरविले जाईल.
५. पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता/पात्रता ही शासकीय मान्यता प्राप्त विद्यापीठातूनच प्राप्त केलेली असणे आवश्यक आहे..
६. उमेदवारांनी अर्जामध्ये नमुद केलेल्या माहितीनुसार अर्जाची छाननी करण्यात येईल.

**अनुभव-**

१. शैक्षणिक अर्हता व आवश्यक अतिरिक्त शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचा शासकीय व निम शासकीय अनुभव ग्राह्य धरण्यात येईल. त्यामुळे अर्जदाराने शैक्षणिक अर्हता धारण करण्यापूर्वीच्या अनुभवाची नोंद करू नये. त्या अनुभवाची परिगणना करण्यात येणार नाही.
२. अनुभवाचा तपशील नमूद करीत असताना अर्जदाराने शासकीय व निम शासकीय संस्थेच्या अनुभव प्रमाणपत्रामधील दिनांक व कार्यमुक्तीचा दिनांक अचूकपणे नमूद करावा. सदर कालावधी अनुभव प्रमाणपत्रानुसारच नोंदविण्याची दक्षता घ्यावी. यामध्ये तफावत आढळल्यास सदर प्रमाणपत्र अवैध ठरविले जाईल.
३. ज्या पदाकरीता अर्ज केला आहे त्या पदाकरीता आवश्यक असलेला अनुभवच ग्राह्य धरण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर अनुभव असल्यास असा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

**संगणक अर्हता-**

१. MSCIT प्रमाणपत्र धारण करीत असल्याचा तपशील नमूद करावा..

**लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र-**

१. लहान कुटुंबाची अट दि. २३/०७/२०२० पासुन लागू करण्यात आली असून दि. २३/०७/२०२०. पासुन दोन पेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियान व १५ वा वित्त आयोगाच्या पदभरतीसाठी अर्ज करण्यास पात्र ठरणार नाहीत.
२. विहित नमुन्यातील प्रमाणपत्र पात्र उमेदवाराने अर्जासोबत सादर करणे अनिवार्य आहे..

**अर्ज शुल्क - (विशेषतज्ञ वगळून)**

१. उमेदवारास अर्जासोबत अर्ज शुल्कासाठी राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (DD) जोडणे आवश्यक आहे. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू. १५०/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू. १००/- असे अर्जाचे शुल्क असेल. त्यासाठी राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष पुढील नावे काढावा.
" INTEGRATED HEALTH AND FAMILY WELFARE SOCIETY PANVEL"
२. राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्षा व्यतिरिक्त इतर कोणत्याही बँकेचा धनाकर्ष (Demand Draft) स्विकारला जाणार नाही. धनाकर्षा शिवाय प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. असे अर्ज अपात्र करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

**उमेदवारांचा फोटो व स्वाक्षरी-**

१. उमेदवाराने अर्जावरील फॉर्म वर फोटोकरीता राखीव ठेवलेल्या जागेवर त्यांचा अलीकडील काढलेला सुस्पष्ट फोटो चिकटवावा. फोटो स्टेपल करू नये.
२. अर्जदाराने स्वाक्षरी साठी राखीव ठेवलेल्या जागेत स्वाक्षरी करावी.

**निवड प्रक्रिया-**

या निवड प्रक्रियेसाठी मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे जा. क्रं. राआसोमुं/मनुष्यबळ कक्र/ पदभरती/१०६७०-११०१६/२०२३ दि.२७.०४.२०२३ रोजीचे पत्राद्वारे प्राप्त सुचना पुढील प्रमाणे :-
१. सदर पदभरती करीता पात्र होणाऱ्या उमेदवारांची थेट मुलाखत पनवेल महानगरपालिका स्तरावरील निवड समितीमार्फत घेण्यात येईल.
२. मुलाखतीद्वारे निवड करावयाची असल्यास मा. अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांच्या दि.१७/०३/२०२२ रोजीच्या पत्रानुसार निकष लावून १:३ व १:५ उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडताना उमेदवाराचे गुणांकन खालील तक्त्यानुसार करण्यात येईल.

**गुणांकन पद्धती-**

| अ.क्र | विवरण | अधिक्तम गुण |
|---|---|---|
| १ | Subject Knowledge | १० |
| २ | Research -cademic Knowledge | १० |
| ३ | Leadership Quality | १० |
| ४ | Administrative Abilities | १० |
| ५ | **Experience** | १० |
| | a) For Govt. Experience | २ Marks for one year |
| | b) For Private Experience | १ Marks for one year |
| | एकुण गुण | ५० |

३. अर्जदाराच्या अर्जाची छाननी करून थेट मुलाखतीस पात्र झालेल्या उमेदवारांची यादी थेट मुलाखतीच्या वेळी सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल.
४. समान गुण प्राप्त झाल्यास ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल तसेच उमेदवारांचे गुणांकन (Merit) व वय देखील समान असेल तर अशा वेळी उमेदवाराचा संबंधित पदाशी निगडित अनुभव जास्त असेल अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.
५. थेट मुलाखतीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांची यादी व प्रतिक्षा यादी पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.
६. सदर ई-मेल आयडी पदभरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत चालू राहील व त्यासाठी ई-मेल वेळोवेळी तपासण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

**सर्वसाधारण सुचना-**

१. सदर पदभरती प्रक्रिये बाबतच्या सर्व आवश्यक सुचना व माहिती पनवेल महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरच वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. या करीता उमेदवारांनी www.panvelcorporation.com या संकेस्थळास वेळोवेळी भेट देऊन माहिती प्राप्त करुन घेणे त्यांची जबाबदारी राहिल. पदभरतीच्या अनुषंगाने कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक संपर्क साधण्यात येणार नाही.
२. जाहीरातीत नमूद केलेले पद हे पूर्णतः कंत्राटी स्वरुपाचे असून ते राज्यशासनाचे नियमित पद नाही, या पदाचा राज्य शासनाच्या पदाशी काहीही संबंध नसून उमेदवार भविष्यात राज्य शासनांच्या नियमित पदावर समायोजन करण्यांची मागणी करु शकणार नाही.
३. जाहीरातीत नमूद केलेल्या पदाचे वेतन हे **एकत्रित ठोक मानधन** आहे.
४. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश दिल्यानंतर ७ दिवसांच्या आत नियुक्तीचे ठिकाणी उपस्थित राहणे बंधनकारक राहील. ( उमेदवाराने निवडीसाठी कोणत्याही दबाव तंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवार मुलाखतीस अपात्र ठरेल)
५. उमेदवाराने थेट मुलाखतीच्या वेळेस अर्जासोबत मुळ कागदपत्रे व त्याच्या साक्षाकित प्रती सादर करणे बंधनकारक आहे.
६. थेट मुलाखतीकरिता येणाऱ्या अराखीव प्रवर्गातील इच्छुक उमेदवारांनी फॉर्म सोबत खालील (१ ते १४) कागदपत्रे जोडावीत व राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी फॉर्म सोबत खालील (१ ते १६) कागदपत्रे जोडावीत.

इच्छुक पात्र उमेदवाराने संकेतस्थळावरील विहित नमुन्यातील भरलेला अर्ज व त्या संबंधातील आवश्यक त्या कागदपत्रासह **थेट मुलाखतीच्या दिवशी पनवेल महानगरपालिका (मुख्यालय)**, वैद्यकीय आरोग्य विभाग, पहिला मजला, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी पनवेल - ४१०२०६, या पत्त्यावर पुढील वेळापत्रकानुसार थेट मुलाखतीकरिता उपस्थित राहावे.

**थेट मुलाखतीचे वेळापत्रक :-**

| अ. क्र. | पदाचे नाव | मुलाखतीचा वार | वेळ | मुलाखतीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | पुर्णवेळ / अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी / विशेषतज्ञ | बुधवार दिनांक ०४.०९.२०२४ रोजी | मुळ कागदपत्रे व प्रमाणपत्रे तपासणी सकाळी ११.०० ते ०१.०० व थेट मुलाखत दुपारी ०२.०० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत | पनवेल महानगरपालिका वैदयकीय आरोग्य विभाग देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी पनवेल -४१०२०६, |

**मुलाखतीवेळी खालील कागदपत्रासह उमेदवाराने हजर राहणे आवश्यक आहे.**

१) पुर्ण माहिती भरलेला अर्ज
२) वयाचा पुरावा
३) पदवी/पदविका प्रमाणपत्रे
४) गुणपत्रिका (सर्व वर्षांची गुणपत्रिका व प्रमाणपत्रे )
५) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (MBBS)/ Any other Medical Graduate with respective council registration (As Applicable).
६) शासकीय/निमशासकीय / संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्रे
७) आधारकार्डची छायांकित प्रत
८) सध्याचा फोटो (२ प्रती)
(९) महिला अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र (Marriage Certificate) तसेच नावत बदल असल्यास राजपत्रातील (Govt. Gazette) आपल्या नावाचा उल्लेख असलेल्या पानाची छायांकित प्रत
१०) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र ( प्रतिज्ञापत्र )
११) अर्जदारावर फौजदारी गुन्हा दाखल नसल्याचे हमीपत्र
१२) महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
१३) राष्ट्रीयकृत यंत्रेचा धनाकर्ष (Demand Draft)
१४) MS-CIT प्रमाणपत्र
१५) जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र सर्व राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी सादर करण बंधनकारक आहे.
१६) नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र (अजा, अज प्रवर्ग वगळुन इतर राखीव प्रवर्गातील) उमेदवारांनी सादर करणे बंधनकारक आहे.

आदिवासी बहुल जिल्हयांसाठी आरक्षणाची पदे भरणे बाबत कार्यवाहीकरिता सुधारित सुचना प्राप्त नसल्याने रिक्त पदांचे संवर्गनिहाय विगतवारी दर्शविण्यात आलेली नाही. बिंदुनामावली बाबत सुधारित सुचना प्राप्त झालेनंतर त्यांचे अधिन राहुनच पुर्णवेळ वैदयकीय अधिकारी (राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान व १५ वा वित्त आयोग अंतर्गत) या पदाकरीता नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील याची सर्व अर्जदारांनी नोंद घ्यावी.

सदर पदभरती प्रक्रियेत आवश्यकते नुसार बदल करण्याचे व सदर पदभरती अंशतः किंवा पूर्ण रद्द करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष, निवड समिती, पनवेल महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत. कृपया याची सर्व अर्जदारांनी नोंद घ्यावी.

**सही/-**
**( डॉ. आनंद गोसावी )**
**वैदयकीय आरोग्य अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

### अर्जाचा नमुना

( ______________________ या पदासाठी अर्ज )

उमेदवाराचा नजीकच्या काळातील (रुंदी 3.5 से.मी व उंची 4.5. से.मी) आकाराचा फोटो चिकटवून स्वत: साक्षांकीत करावा

प्रति,
मा.आयुक्त
पनवेल महानगरपालिका

१. संपूर्ण नाव :- ..........................................
(प्रथम आडनाव )
२. वडिलाचे / पतीचे नाव :- ..........................................
३. सद्या राहण्याचा पत्ता :- ..........................................
४. भ्रमणध्वनी क्रमांक : (१) .................... (२) ....................
५. जन्मतारीख :- .................... दिनांक / /२०२४ रोजीचे वय ............. राष्ट्रीयत्व.............
६. उमेदवार विवाहीत / अविवाहित :-....................
७. (अ) जात :- .................... (ब) जात वैधता प्रमाणपत्र आहे /नाही.
८. धर्म :-....................
९. ई-मेल आयडी

१०. खाली नमुद केलेल्या प्रवर्गापैकी योग्य चौकोनात () अशी खुण करावी.

| अ.जा (SC) | अ.ज (ST) | वि.जा(अ) (VJ-A) | भ.ज.(ब) (NT-B) | भ.ज (क) (NT-C) | भ.ज (ड) (NT-D) | वि.मा.प्र (SBC) | इ.मा.व (OBC) | ई.डब्ल्यु.एस (EWS) | खुला (OPEN) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

पान ७ वर...

# नवी मुंबईतील झाडांसाठी तज्ज्ञांची नेमणूक

## वृक्षसंपदा जतन व रक्षणाकरिता महापालिका क्षेत्रात महत्त्वाचे पाऊल

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई पालिका क्षेत्रातील वृक्षांचे जतन, व्हावे तसेच स्थलांतरित करण्यासाठी योग्य पद्धती वापरली जावी यासाठी पालिकेने तज्ज्ञ समितीची नेमणूक केली आहे. यापुढे या तज्ज्ञांच्या निरीक्षणाखाली वृक्ष संवर्धन होणार आहे.



याबाबत पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या परीपत्रकानुसार स्थानिक वृक्ष प्राधिकरणाच्या कर्तव्यांमध्ये या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींचा सल्ला व मार्गदर्शन घेण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्या अनुषंगाने नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील खासगी, सार्वजनिक ठिकाणावरील वृक्ष तोडणे अथवा स्थलांतरित करणेकरिता वृक्षसंगोपन तज्ज्ञ, बागकामतज्ज्ञ या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींची नेमणूक करणेत आलेली आहे. यामुळे महापालिका क्षेत्रातील कोणतेही वृक्ष विनाकारण तोडले जाणार नाहीत. या अनुषंगाने विकास कामामध्ये येणाऱ्या किंवा धोकादायक वाटणाऱ्या प्रत्येक झाडाची प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करण्यात येणार आहे. यामुळे वृक्ष आहे त्याच जागी ठेवून वाचविणे शक्य असल्यास त्यादृष्टीने प्रयत्न करण्यात येतील तसेच सदर वृक्ष बाधित होणार असल्यास त्या वृक्षाचे इतर ठिकाणी स्थलांतर करताना शास्त्रीय पध्दतीने पुनर्रोपण करण्यात येईल. त्याचप्रमाणे काही वृक्षावर कीड किंवा रोगाचा प्रादुर्भाव आढळल्यास आवश्यकतेनुसार उपाययोजना करण्यात येणार आहे. या वृक्षांची तपासणी करताना रजिस्ट्रोग्राफसारख्या अत्याधुनिक उपकरणांचाही वापर करण्यात येणार आहे.

नवी मुंबई महापालिकेने याकामी नेमणूक केलेल्या वृक्षसंगोपन तज्ज्ञ, बागकामतज्ज्ञ क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींमध्ये बेलापुर येथील असिम हरवंश, खेतवाडी मुंबई येथील नकुल सवानी, दिवा येथील गौरवी ठसाळे, डोंबिवली येथील ऋतिक मुरुडकर, मालाड येथील वैभव राजे अशाप्रकारे पाच तज्ज्ञांचा समावेश आहे.

यामुळे खासगी क्षेत्रातील वृक्ष तोडण्याची मागणी करणाऱ्या नागरिकांनासुध्दा या वृक्षसंगोपन तज्ज्ञ, बागकामतज्ज्ञ क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींचा सल्ला घेता येणार आहे. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागाने केलेल्या या तज्ज्ञांच्या नेमणूका नवी मुंबईतील वृक्षसंपदा रक्षण व जतन करण्यासाठी महत्त्वाच्या आहेत.

## निवडक

### गोवर्धनी देवी मंदिराचा जीर्णोद्धार



**नवी मुंबई :** श्री कृष्णाष्टमी निमित्त बेलापूर किल्ले गावठाण येथील आई गोवर्धनी देवी मंदिराचा १७वा जीर्णोद्धार सोहळा थाटामाटात झाला. या वेळी मंदिरात शेकडो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. नवी मुंबईतील सुमारे ३०० वर्षापूर्वीचे पुरातन पेशवेकालीन एकमेव मंदिर म्हणून आई गोवर्धनी माता मंदिराची आख्यायिका आहे. आई गोवर्धनी मातेची प्राणप्रतिष्ठापना पेशवेकाळात झाली असून नवी मुंबईतीलच नव्हे तर संपूर्ण पंचक्रोशातील ठाणे, रायगड, पालघर, जिल्ह्यातील सर्व भाविक भक्तांना नवसाला पावणारी आई गोवर्धनी माता प्रसिद्ध आहे.

### शिक्षिका अंजुला राय यांचा गौरव




**नवी मुंबई :** लायन्स क्लब नेरूळ, वाशीतर्फे जन्माष्टमी व शिक्षक दिन साजरा करण्यात आला. लायन्स क्लब नेरुळच्या अध्यक्षा लक्ष्मी अरविंद शर्मा, क्षेत्रीय अध्यक्ष अगततीर्थ कीर्थप्पा, झोन अध्यक्ष संजय चौरसिया, सचिव बाबुराज पुलानी, कोषाध्यक्ष राकेश वार्ष्णेय उपस्थित होते. या वेळी सेंट जोसेफ वडाळा येथे २६ वर्षे शिक्षणाची सेवा बजावणाऱ्या तसेच सामाजिक कार्यकर्त्या असलेल्या शिक्षिका अंजुला राय यांचा गौरव करण्यात आला. ज्येष्ठ कवी, साहित्यिक अरविंद शर्मा राही, भाजपा उत्तर भारतीय मोर्चा नवी मुंबई अध्यक्ष राजेश राय, भाजप दक्षिण सेलचे अध्यक्ष शशी दामोदरन, अरविंद गुप्ता, पंकज शर्मा आणि लायन्स क्लबचे सर्व अधिकारी उपस्थित होते. अंजुला राय या श्री माँ फाऊंडेशनच्या अध्यक्षा आहेत.

### 'बालगोपाळ'ची सामाजिक बांधिलकी



**नवी मुंबई :** गेली सलग १५ वर्षांची परंपरा जपत मोठ्या उत्साहाने साजरा होणारा बालगोपाळ मित्र मंडळाचा दहीहंडी उत्सव काही कारणास्तव यावर्षी रद्द करण्यात आला. मंडळाचे सर्वेसर्वा मिलिंद सुर्यराव आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी एकमताने निर्णय घेऊन बाळगोपाळ मित्र मंडळाचे सदस्य असलेले स्व. विलासशेठ डोके यांच्या स्मरणार्थ दहीहंडी उत्सवासाठी होणाऱ्या खर्चातील रक्कम रु. ५१००० रुपये विवेकानंद शाळेतील गरजू विद्यार्थ्यांची शैक्षणिक फीकरिता शिक्षण मंडळाचे कार्याध्यक्ष श्रीकांत तरटे व शाळेचे माजी मुख्याध्यापक सुधीर जोशी यांच्याकडे सुपूर्द करून सामाजिक बांधिलकी जपण्याचे कर्तव्य पार पाडले. या निर्णयाचे सर्वच स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

### शिरवणेत हंडी फोडण्याची अनोखी प्रथा



**नवी मुंबई :** नेरूळ विभागातील शिरवणे गावात अडकवलेली हंडी उडी मारून डोक्याने फोडण्याची प्रथा आहे. यंदा या प्रथेचे ११० वे वर्ष होते. हर्षल पाटील या तरुणाने उडी मारुन ही हंडी फोडली. हनुमान विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष संतोष सुतार तसेच माजी नगरसेवक ज्ञानेश्वर सुतार यांनी हर्षल यास रोख व चषक पारितोषिक देऊन गौरव केला.

# चिरनेर कातळपाड्यात बालगोपाळांचा आनंदोत्सव



**चिरनेर : रामप्रहर वृत्त**

बालगोपाळ मित्र मंडळ चिरनेर कातळपाडा या गोविंदा पथकाच्या वतीने दहीहंडीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मंडळाचे हे दुसरे वर्ष आहे. गेले आठ दिवस हे बाल गोपाळ दहीहंडी उत्सवाच्या तयारीत होते. रात्री १२ वाजता या बालगोपाळांनी श्रीकृष्ण जन्मोत्सवाची पहिली दहीहंडी फोडली.

गोपाळकाल्याच्या दिवशी काव्य म्हात्रे व सार्थक म्हात्रे यांच्या घराच्या मोकळ्या जागेत या बालगोपाळांनी दहीहंडी बांधली होती. डीजेच्या तालावर अनेक गाण्याच्या ठेक्यावर आणि ढोल ताशाच्या निनादात, मौजमजा करत, एकमेकांना भिजवत आणि दहीहंडी फोडण्याच्या कसरती व सलामी देत, या बच्चे कंपनीने दहीहंडी फोडण्याचा आनंद घेतला.

शेवटी ही दहीहंडी गणेश मिस्त्री, सार्थक म्हात्रे, ऋषिकेश भगत, आर्यन केणी काव्य म्हात्रे, विघ्नेश वशेणीकर निनाद वशेणीकर, सोहम भोईर, यश चव्हाण यांच्या प्रयत्नातून फोडण्यात आली. पूर्वा म्हात्रे, स्वरा म्हात्रे, दीप्ती वशेणीकर, वैष्णवी वशेणीकर, कस्तुरी म्हात्रे या तरुणींनी या बालगोपाळांना प्रोत्साहित करत दहीहंडीत सहभाग घेतला. या वेळी बालगोपाळांच्या आनंदाला उधाण आले होते.

दरम्यान, या दहीहंडी उत्सवात गोविंद पथकाचे करण परदेशी, सार्थक म्हात्रे, प्रणिश, विघ्नेश, सोनू, तन्मय, दुर्वेश, क्रिश, शुभम, सोहम, सत्यम, ऋषिकेश, भाग्येश, सार्थक, काव्य, निनाद, हर्ष, स्वराज, ध्रुव यश, प्रणय, प्रग्नेषा तसेच इतर बाल गोपाळ सहभागी होऊन, हा दहीहंडीचा उत्सव यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.



**उलवे नोड : परिसरातील विविध सोसायट्यांनी मिळून अनमोल जीवन वेल्फेअर असोसिएशनची स्थापना केली आहे. असोसिएशनच्या वतीने २०२३-२४चा वार्षिक अहवाल तयार करण्यात आला असून याचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते मंगळवारी झाले. या वेळी वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, निलेश खारकर, असोसिएशनचे अध्यक्ष निवृत्ती मुरादे, सचिव आदेश बोराडे, उत्सव प्रमुख अजिंक्य गटे, सल्लागार किरण जगताप उपस्थित होते.**

## खारघरमध्ये तरुणीचा विनयभंग; अल्पवयीन मुलगा ताब्यात

**पनवेल :** खारघर वसाहतीमध्ये राहणाऱ्या एका १८ वर्षीय तरुणीला त्याच भागात राहणाऱ्या एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलाने तिचा पाठलाग करून तिला मिठी मारून तिचा विनयभंग केल्याची घटना घडली आहे. ही तरुणी सेक्टर १३ मधील टेलरकडे कपडे फिटींगसाठी देऊन घरी जात होती. त्याचवेळी त्या भागात राहणाऱ्या एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलाने तिचा पाठलाग करून तिला पाठीमागून मिठी मारूनविनयभंग केला. तरुणीने आरडाओरडा करून त्याला ढकलून दिल्याने परिसरातील नागरिकांनी त्या मुलाला ताब्यात घेऊन खारघर पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

# जन्माष्टमी व दहीहंडीनिमित्त आठ जिल्ह्यांच्या भजन स्पर्धा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थान-उपपीठ मुंबई यांच्या विद्यमाने श्री कृष्ण जन्माष्टमी सोहळा, गोपाळ काला (दहिहंडी), महिला मेळावा, नाम गजर तसेच आठ जिल्ह्यांच्या भजन स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाल्या.

मुंबई, वसई, पश्चिम पालघर, पूर्व पालघर, ठाणे, ग्रामीण ठाणे, दक्षिण ठाणे व नवी मुंबई तून गोविंदा पथक सकाळ पासूनच दाखल झाले. प्रत्येक जिल्ह्यातून युवापिढीने आपल्या दहिहंडी पथकातून वेगवेगळ्या प्रकारे कौशल्य कल्पना वापरून आपले वेगळेपण दाखवले होते. ठाणे शहर जिल्ह्याचा दहिहंडी पथकाने गुरुमाऊलीचे हिंदूचे धर्मगुरु म्हणून असलेले विचार, प्रत्येक हिंदू धर्मियांची एकजूट होण्यासाठी वेगवेगळ्या जातीत न अडकता एक हिंदू म्हणून एकत्रित आले तर नक्कीच आपल्या धर्माची ताकद व पताका मजबूत होणारा देखावा उभा केला होता. तर मुंबईतून राधा-कृष्णाच्या निस्सीम प्रेम तसेच समाजात सुरक्षितता व आदर सन्मान देण्याचा संदेश देणारा सुंदर असा देखावा सादर केला होता.

गुरुमाऊलींच्या उपस्थित भगवान श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळा झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी गुरुमाऊलीं सर्वांना दुध, दही, लोणी, हळदीने न्हावू घालत होते. नाचगाण्यांच्या तालात भाविक नाचत होते. गुरुमाऊलीनी सर्वांना विविध फळांचा, चॉकलेटचा प्रसाद वाटप केला. भाविकांना २४ तास महाप्रसादाचे नियोजन करण्यात आले होते. १२ ते १५ हजार भाविकांनी कार्यक्रमाचा लाभ घेतला.

# बंदर कामगारांना साडेआठ टक्के वेतनवाढ

**उरण : प्रतिनिधी,**
**वार्ताहर, प्रतिनिधी**

नुकत्याच झालेल्या बैठकीत आय.पी.ए.चे व मुंबईचे पोर्ट ट्रस्टचे चेअरमन राजीव जलोटा, मॅनेजिंग डायरेक्टर विकास नरवाल आणि सहा कामगार महासंघाचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत बंदर कामगारांना साडेआठ टक्के वेतनवाढीस मंजुरी देण्यात आली. त्याच बरोबर १ जानेवारी २०२२ पासून ते ३१ डिसेंबर २०२६ अखेर पाच वर्षाच्या या वेतन करारात, ३२ महिन्यांचा एरियस मिळणार आहे.

तसेच ५०० रुपये स्पेशल अलाउन्स मंजूर करण्यात आला आहे. त्याचबरोबर ३० टक्के व्ही. डी.ए.देण्यात येणार आहे. अशा प्रकारचा कामगारांच्या हिताच्या आणि जिव्हाळ्याच्या वेतन कराराच्या एम.ओ.यु.वर या बैठकीत सह्या केल्या गेल्या.



वेतन कराराची ही आठवी बैठक होती. पुढील १५ दिवसांत या सेटलमेंट वर प्रत्यक्ष सह्या होतील. या वेतन करारात भारतीय मजदूर पोर्ट अँड डॉक महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री व वेतन करार समितीचे सदस्य सुरेश पाटील, भारतीय पोर्ट अँड डॉक मजदूर महासंघ (बी एम ए) राष्ट्रीय कोषाध्यक्ष सुधीर घरत यांनी कामगारांच्या बाजूने मोलाची आणि भरीव भूमिका बजावली.

त्यांच्यासोबत भारतीय मजदूर पोर्ट अँड डॉक महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रीकांत राय, ऑल इंडिया पोर्ट अँड डॉक चे मोहम्मद हनीफ, केरसी पारिख, अफराज, विद्याधर राणे, मोहन आसवाणी, नरेंद्र राव इत्यादी पदाधिकारी सहभागी होते. या वेतन करार मंजुरीत केंद्रीय पोर्ट्स शिपिंग व जलमार्ग कॅबिनेट मंत्री सर्बानंद सोनोवाल तसेच भारतीय मजदूर संघाने विशेष सहकार्य केले.

केंद्रीय पोर्ट, शिपिंग व जलमार्ग कॅबिनेट मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी कामगारांच्या हिताच्या बाजूने सहकार्य केल्याने कामगारांत समाधानाचे वातावरण आहे. त्यामुळे या वेतन करारासाठी २८ ऑगस्टपासून घोषित केलेला संप सर्व कामगार महासंघाने रद्द केला आहे.

# बेपत्ता दुसऱ्या एजंटचाही मृतदेह सापडला

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईत गेल्या आठवड्यात एक कार बेवारस अवस्थेत आढळून आली होती. या कारवर गोळीबार झाला होता. त्यावर रक्ताचे डाग होते, पण गाडी ज्यांच्या मालकीची होती ते दोघेही कारमध्ये नव्हते. आता दोघांचेही मृतदेह संशयास्पद अवस्थेत आढळून आले आहेत. कार सापडल्यानंतर दुसऱ्या दिवशी इस्टेट एजंट सुमित जैनचा मृतदेह पेण-खोपोली रोडवर गागोदे गावाच्या हद्दीत सापडला होता. तर आता आठवड्याभराने अमीर खानजादा याचा मृतदेह कर्नाळा अभयारण्यात सापडला आहे.

इस्टेट एजंट असलेल्या दोघांचेही मृतदेह हाती लागले असून या प्रकरणी पाच जणांना अटक करण्यात आली आहे. सुमित जैनचा मृतदेह सापडल्यानंतर संशयाची सुई अमीर खानजादा याच्यावर होती. जैन याला पोलीस सुरक्षा हवी होती त्यांनीच सुपारी दिलेली. अंगावर वार झाल्याने बीपी हाय होऊन मृत्यू झाला, पण मंगळवारी रात्री अमीर खानजादा याचाही मृतदेह कर्नाळा अभयारण्यात सापडला आहे. अमीर खानजादा राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचा रायगडचा पदाधिकारी आहे. यातील आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. नक्की त्यांनी त्यांना का मारले? कोणते कारण होते? याचा तपास पोलीस करत आहेत.

नेरूळवरून मिटींगसाठी दोघेही निघाले होते, पण सकाळपर्यंत ते घरी पोहचले नव्हते. मोबाईल बंद असल्याने जीपीएसच्या आधारे त्यांचा माग काढण्याचा प्रयत्न केला. तेव्हा गुरुवारी २२ ऑगस्टला त्यांची कार पाली फाटा एक्झिटवर आढळून आली. कारवर मागून गोळीबार झाला होता तसेच रक्ताचे डागही आढळले होते, पण दोघेही गाडीत नव्हते. बुधवारी रात्री साडेदहा वाजता ते मिटिंगसाठी निघाले होते.

दुसऱ्या दिवशी सकाळीही ते घरी न पोहचल्याने कुटुंबियांनी त्यांना फोन केले. मोबाईल बंद असल्याने घरच्यांची चिंता वाढली. शेवटी दोन्ही कुटुंबियांनी पोलीस ठाण्यात दोघेही बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली. अमीर खानजादा यांच्या कारला जीपीएस असल्याने कारचा शोध घेता आला.

# हातमाग, यंत्रमाग कापडाच्या प्रदर्शन व विक्री केंद्राचे उद्घाटन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सोलापूर येथील भाऊराया हॅण्डलूम यांचे हातमाग व यंत्रमाग कापडाचे भव्य प्रदर्शन व विक्री केंद्राचे अलिबाग येथे उद्घाटन करण्यात आले आहे.




अलिबाग येथे सार्वजनिक वाचनालय डोंगरे हॉल येथे सुरू करण्यात आलेल्या या प्रदर्शनाचे उदघाटन महाराष्ट्र राज्य दिव्यांग सल्लागार साईनाथ पवार व माजी जिल्हा परिषद अधिकारी सुरेश म्हात्रे व सार्वजनिक वाचनालयाचे ग्रंथपाल भालचंद्र वर्तक यांच्या हस्ते प्रदर्शनाचे द्वीप प्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. २५ सप्टेंबरपर्यंत हे प्रदर्शन चालणार आहे.

हातमाग विणकाम करून तयार केलेले कापड चांगला दर्ज्याचा असते त्यामुळे हातमाग कापड प्रदर्शनाच्या अलिबागकरांनी लाभ घ्यावा, असे आवाहन हातमाग कापड प्रदर्शनाचे प्रमुख पांडुरंग पोतन यांनी केले. या वेळी गोवर्धन कोडम, बाळू कोडम, योगेश पोतन, पुरुषोत्तम पोतन, दीपक गुंडू, श्रीकांत श्रीराम, लक्ष्मण उडता आदी उपस्थित होते. या प्रदर्शनामध्ये विविध प्रकारच्या हातमाग व यंत्रमागवर उत्पादित वस्त्रे जसे कॉटन साडी, इरकल साडी, मधुराई साडी, खादी साडी, धारवाड साडी, मधूराई सिल्क साडी, सेमी पैठणी, खादी सिल्क साडी, प्रिंटेड ड्रेस, कॉटन परकर, टॉप पिस, सोलापूर चादर, बेडशीट, नॅपकिन, सतरंजी, टॉवेल, वुलनचादर, प्रिंटेड बेडशीट, पिलो कव्हर, लुंगी व शर्ट, कुर्ता अशा विविध प्रकारचे कपडे विक्रीसाठी टेवण्यात आले आहे.

सुती व खादी कापडाच्या विक्रीवर २० टक्के सुट ठेवण्यात आले असून अलिबागकरांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा. सार्वजनिक वाचनालय डोंगरे हॉल, रायगड जिल्हा परिषद जवळ, मुख्य पोस्ट ऑफिस समोर अलिबाग येथे हे प्रदर्शन सकाळी १० ते सायंकाळी ९ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे.

## रामप्रहर श्रावणधारा


### श्रावण

तृण पर्णात रुजून हिरव्या
सृष्टीत जणू बहरे अवघ्या
फांदी फांदीवरही नवख्या
मजेत खेळे सुरपारंब्या...

ऊन सरींचा खेळ गोजिरा
मनी अंगणी रंग साजिरा
ऋतू सोहळा करी साजरा
कुणी म्हणे का यास लाजरा...

मैफिल हिरवी ठायी ठायी
ताडपत्री नि हंगामी गवई
दिडदा दिडदा सुरात गाई
सुखवेल तान हलके घेई...

तन मनात हा नित झिरपावा
काव्या मधुनी आणि फुलावा
चराचरातुन तरी उरावा
असाच श्रावण नित्य असावा...
असाच श्रावण नित्य असावा...



-निलिमा देशपांडे,
नवीन पनवेल

# माणगाव तालुक्यात दहीहंडी उत्सव उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यात दरवर्षीप्रमाणे यावर्षीही दहीहंडी सण उत्साहात साजरा करण्यात आला. तालुक्यात अनेक गावांतून मोठ्या प्रमाणात दहीहंड्या बांधण्यात आल्या होत्या. अधूनमधून पडणाऱ्या पावसामुळे गोविंदा पथकांचा उत्साह ओसंडून वाहत होता.

शहरातील सोनभैरव गोविंदा पथक खांदाड, वाकडाई गोविंदा पथक उतेखोल, जय हनुमान गोविंदा पथक उतेखोलवाडी, साईनगर, दत्तनगर गोविंदा पथक यांनी सहा ते सात थर लावून प्रोत्साहनपर बक्षिसे पटकावली. सुवर्णा जाधव यांच्या दहीहंडी उत्सवाला आमदार भरत गोगावले, अ‍ॅड. राजीव साबळे, अ‍ॅड. महेंद्र मानकर व केजीएन महिला मंडळ ग्रुप यांनी विशेष शुभेच्छा दिल्या.

सुवर्णा जाधव यांच्यातर्फे त्यांच्या गोविंदा पथकांसाठी ठेवण्यात आलेला दहीहंडी उत्सव आकर्षण होते. सोनभैरव गोविंदा पथक खांदाड यांच्या पुरुष गोविंदा पथकाने पहिल्याच प्रयत्नात सात थरांची सलामी दिली. याच मंडळाच्या मुलींच्या गोविंदा पथकाने पहिल्याच प्रयत्नात पाच थरांची सलामी देऊन उपस्थित मान्यवर व नागरिकांकडून कौतुकाची थाप मिळविली, तसेच वाकडाई गोविंदा पथक उतेखोल यांनी याठिकाणी पहिल्याच प्रयत्नांत सहा थरांची सलामी दिली. या उत्सवात सहभागी झालेल्या पुरुष गोविंदा पथकांसाठी पाच थर पूर्ण लावणाऱ्या गोविंदा पथकास रोख ३३३३ रुपये, सहा थर पूर्ण लावणाऱ्या गोविंदा पथकास रोख ४४४४ रुपये, सात थर पूर्ण लावणाऱ्या गोविंदा पथकास रोख ६६६६ रुपये तर महिला गोविंदा पथकांसाठी तीन थर पूर्ण लावणाऱ्या गोविंदा पथकास रोख २२२२ रुपये, चार थर पूर्ण लावणाऱ्या गोविंदा पथकास रोख ३३३३ रुपये, पाच थर पूर्ण लावणाऱ्या गोविंदा पथकास रोख ५५५५ रुपये अशी आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली होती.

गोविंदा पथकांना नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, सुवर्णा जाधव, शर्मिला सत्वे, विवा कॉलेज माणगाव प्राचार्य विवेक ढेपे, रुपेश जाधव व जाधव परिवार तसेच एकता नगरातील ग्रामस्थांकडून बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.



## पोयनाड येथे पंतप्रधान जनमन न्याय महाभियान

**अलिबाग : प्रतिनिधी**

तालुक्यातील पोयनाड येथील आदिवासीवाडी येथे बुधवारी (दि.२८) पोयनाड विभाग मंडळ अधिकारी कार्यालयामार्फत आदिम जमातीच्या कातकरी समाजाच्या विकासाकरिता प्रधानमंत्री आदिवासी न्याय महाअभियान, पीएम-जनमन ही मोहीम राबविण्यात आली.

या कार्यक्रमांतर्गत आदिवासी जमातीच्या समाजाकरिता विविध सुविधा देण्यात येणार आहेत, त्यात प्रामुख्याने आधार कार्ड, आयुष्यमान भारत कार्ड, जातीचे दाखले, सिकल सेल स्क्रिनींग, वनपट्ट्यांना मंजुरी देणे, शिष्यवृत्ती, मातृत्व लाभ, किसान कार्ड, सन्मान निधी योजना अशा विविध सरकारी योजनांचा समावेश आहे.

या कार्यक्रमासाठी मंडळ अधिकारी पोयनाड महेश निकम, पोयनाड तलाठी आर.एन पाटील, शहाबाज तलाठी शिल्पा गवटे, पोयनाडचे माजी ग्रामपंचायत सदस्य अजित चवरकर, अजय टेमकर, मालिनी उदय चवरकर, ग्रामपंचायत कर्मचारी काशिनाथ पाटील, रत्नदीप पाटीलसह सर्व आशासेविका, आदिवासीबांधव उपस्थित होते.

## खोपोलीत कामगारांच्या वारसांना नोकरी

**खोपोली :** येथील नगर परिषदेत बंडू कदम व हर्षल मोरे हे सफाई कामगार कार्यरत होते. बंडू कदम यांनी स्वच्छनिवृत्ती घेतली, तर हर्षल मोरे हे मृत्यू पावले होते. शासन धोरणानुसार लाड समितीच्या शिफारशीनुसार मुख्याधिकारी पंकज पाटील यांनी बुधवारी (दि.२८) बंडू कदम यांचे वारस अक्षय कदम यांना व हर्षल मोरे यांची बहीण श्रुती मोरे यांना पदावर नियुक्त केले.

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जलव्यवस्थापन विभाग नवीन पनवेल**

**ई-निविदा सुचना क्र. २१ सन २०२४-२५**

**अतिरिक्त ४० द. ल. लि. जे. एन. पी. टी. पाणी पुरवठा योजना. ता. उरण, जि. रायगड. (पुर्ण ठेव)** जासाई गावठाणामध्ये गव्हाणफाटा ते करळफाटा साखळी क्र. २४०० ते ४२७५ (एकुण लांबी १८७५) मध्ये १११८ मि. मी. व्यासाची मृदु पोलादी जलवाहिनी टाकणे. या कामाच्या निविदा मजीप्राकडून मागविण्यात येत आहे. कामाची अंदाजित रक्कम रू. ११,७९,६६,०९८/- आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दि. २९/०८/२०२४ पासून www.mahatenders.gov.in या वेब पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

निविदा प्रक्रिया कार्यक्रमाच्या सर्व तारखा www.mahatenders.gov.in या वेब पोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा सुचनेनुसार राहतील.

दिनांक : २३/०८/२०२४

**सही/-**
**(एस.पी. वेंगुर्लेकर)**
कार्यकारी अभियंता म.जी.प्रा.
जलव्यवस्थापन विभाग नवीन पनवेल

**नोटीस**

**नीलकंठ कृष्णा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पत्ता प्लॉट क्र ३२ MCCH सोसायटी पनवेल** या संस्थेचे सभासद असलेल्या वा संस्थेच्या इमारतीत **सदनिका क्र २०२** धारण करणाऱ्या **श्रीमती. रोहिणी कृष्णकांत पंडित** यांचे दिनांक. ३१/०५/२०२४ रोजी निधन झाले.

त्यांनी **श्री. प्रकाश गजानन जोशी** यांना नामनिर्देशन केलेले आहे. संस्था या नोटिशीद्वारे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सभासदाचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सभासदाचे वारसदार किंवा अन्य मागणीदार/ हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या/ हरकती मागविण्यात येत आहेत. हि नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून ३० दिवसात इतर कोणी हक्कदार असतील त्यांनी आपल्या मागण्यांचा वा हरकतींच्या पुष्ट्यर्थ आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रति व अन्य पुरावे सादर करावे. जर वर नमूद केलेल्या मुदतीत कोणाही व्यक्तीकडून हक्क / मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत, तर मयत सभासदाने संस्थेच्या भांडवलातील / मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अश्या कोणत्याही हक्क/मागण्या/हरकती आल्यावर त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधीची एक प्रत मागणीदारास/हरकतदारास संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत नोटीस दिल्याच्या तारखेपासून नोटिशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

**सही/-**
**सचिव**
**नीलकंठ कृष्ण सहकारी गृहनिर्माण संस्था म. यांच्या करिता आणि वतीने**
**प्लॉट नं ३२ मिडलक्लास सह. गृह, संस्था मर्या. पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड**

**अर्जंट पाहिजेत**

पनवेल मधील बिल्डर फर्मसाठी अकाउंटेट पाहिजे, बी.कॉम. टॅली, ३-४ वर्षाचा अनुभव व ऑफिस बॉय पाहिजे.

संपर्क-८३५५८१७७१८/९८१९६९५७७४

**Rayat Shilshan Sansth's**

**Loknete Ramsheth Thakur Public school, Kamothe**

**Plot No. 40, Sector-6A, Kamothe, Navi Mumbai-410209, Pho No. 022-27431262**

**CBSE Affiliation No.1131281**

**TENDER NOTICE**

Tenders are invited from reputed firms/companies through e-Tendering process for the Interior work of Exam Room .

The detail information of tender such as tender fees, terms, conditions and technical specifications of the tender process is available on our web site ***https://edumart.sets.co.in*** from **30/08/2024** and Tender must be submitted online to this website up to **13/09/2024 @ 2.00 pm.**

Details are as follows –

| Work | Construction Area | Aprox. Cost of Project | Earnest Money Deposit (1%) | Tender Cost (Non refundable) |
|---|---|---|---|---|
| Interior work of Exam Room | 30 sqm (315 sft ) | 8,21,000/- | Rs. 8,210/- | Rs. 1000/- |

**Principal,**
**Loknete Ramsheth Thakur Public school, Kamothe**

**शुध्दीपत्रक**

शुध्दीपत्रक देण्यात येते कि, दि २४ ऑगस्ट २०२४ रोजी रामप्रहर ह्या वृत्तपत्रामध्ये पान क्र. ५ वर माझ्या कडून जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर जाहीर नोटीस मध्ये नमूद केलेले मिळकतीचे वर्णन मध्ये मौजे उसर्ली बुद्रुक, ता पनवेल व जिल्हा रायगड येथील गट नं. १९ हि.नं. ५ क्षेत्र ०-४१-०० पो.ख.०-०५-०० एकूण ०-४६-०० आकार ०-९१ असे नजरचुकीने छापण्यात आले होते. तरी ह्यापुढे सदर जाहीर नोटीस मध्ये नमूद मिळकतीचे गट नं. १९ हि.नं. ४ क्षेत्र ०-४१-०० पो.ख.०-०५-०० एकूण ०-४६-०० आकार ०-९१ असे वाचण्यात यावे.

**दिनांक : २९.०८.२०२४**
**ठिकाण : मु. पनवेल जि. रायगड**

**सही /-**
**अ‍ॅड. मनीष आर बोहरा**

पत्ता :- १०४,१४२अ, धनश्री बिल्डिंग, एम.सी.सी.एच सोसायटी, मु. पनवेल जि. रायगड ४१० २०६ मोबाईल नं. ९७०२३५११११/७०२१७७९६७९

**जाहिरात २०२४**

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम रायगड अंतर्गत, NGO-PP Partnership 2019 अंतर्गत डी-आर टीबी सेंटर करिता इच्छुक असलेल्या अशासकीय / स्वयंसेवी संस्था यांचेकडून अर्ज मागविण्यांत येत आहेत. अर्जाचा नमुना अटी व शर्ती तसेच विस्तृत माहिती मा. जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांच्या https://raigad.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. तसेच खालील योजनेची सविस्तर माहिती https://tbcindia.mohfw.gov.in/ च्या Guidance Document on Partnership 2019 page no.40 NGO/PP scheme Diagnostics - ii) DR- TB Treatment Centre (indoor) वर उपलब्ध आहे. तरी पात्र असणाऱ्या अशासकीय / स्वयंसेवी संस्थेने अर्ज विहित नमुन्यात जिल्हा क्षयरोग अधिकारी, जिल्हा क्षयरोग केंद्र, अलिबाग, पारिजात सोसायटी, प्लॉट नं. १४, श्रीबाग नं.२, रायवाडी कॉम्प्लेक्स, चेंढरे, अलिबाग, जि. रायगड, पिन ४०२२०१ येथे **दि.०४.०९.२०२४ रोजी सायं. ६ वा. पर्यंत** सादर करावे. या मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. छाननी नंतर पात्र ठरणाऱ्या अशासकीय / स्वयंसेवी संस्थांना प्रत्यक्ष भेट देऊन मुल्यांकन करण्यांत येईल. त्यानंतर मुलाखती करीता बोलाविण्यांत येईल. सदर प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द व पुढे ढकलण्याबाबतचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, जिल्हा रायगड अलिबाग, यांचेकडे राखिव असतील.

**सही/-**
**जिल्हा क्षयरोग अधिकारी**
**जिल्हा क्षयरोग केंद्र,**
**रायगड अलिबाग**

**सही/-**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**रायगड जिल्हा परिषद**
**अलिबाग**

**क्र. जिमाका/ राअ/ जाहि/७३/२०२४-२०२५**

**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**

नगरपरिषद दुबे रुग्णालय इमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन-४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे. ईमेल :- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in वेबसाईट :- http://kbmc.gov.in

जा.क्र. : कुबनप/साबां/६९६/२०२४-२५

दिनांक : २८/०८/२०२४

**जाहिर ई- निविदा सुचना क्र. २१/२०२४-२५**

कुळगांव बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या बाह्य रस्ते विकास योजने अंतर्गत विविध कॉंक्रीट रस्त्यांची ७ कामे मंजुर करण्यात आलेली आहे. सदर कामांकरीता महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन टक्केवारी दराच्या ई-निविदा मागविण्यात येते आहे. सदर ई-निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि.२९/०८/२०२४ ते दि. ०४/०९/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत असून दि. ०२/०९/२०२४ रोजी दुपारी १२.०० वा निविदा पूर्व बैठक नगरपरिषदेच्या कार्यालयातील बांधकाम विभागात आयोजित केलेली आहे. तसेच सदरची ई-निविदा दि.०५/०९/२०२४ रोजी दुपारी ५.०० वाजल्यानंतर उघडण्यात येतील.

निविदेबाबतच्या सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in तसेच शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर व नगरपरिषदेच्या सुचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**कुळगाव बदलापूर नगरपरिषद**
**कुळगाव**

**पान ५ वरुन...**

**११. शैक्षणिक अर्हता :- जसे MBBS / MBBS + Psychiastrist (MD Psychiatry / DPM/DNB), ENT Specialist (MS ENT/DORL/DNB)**

| उत्तीर्ण केलेली व्यवसायिक परिक्षा | विद्यापीठ/ मंडळाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | अंतिम वर्षांचे मिळालेले गुण (एकुण) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(स्वप्रमाणित केलेल्या प्रमाणपत्राच्या प्रती)

१२. अतिरिक्त अर्हता :-जसे पदवीत्तर

| उत्तीर्ण केलेली व्यवसायिक परिक्षा | विद्यापीठ/ मंडळाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | अंतिम वर्षांचे मिळालेले गुण (एकुण) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

(स्वप्रमाणित केलेल्या प्रमाणपत्राच्या प्रती)

१३. अनुभव

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकुण वर्षे | सेवा सोडल्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| | पासुन | पर्यंत | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(प्रमाणपत्राच्या प्रती)

१४. अवगत असणाऱ्या भाषा :

| | मराठी | हिंदी | इंग्रजी |
|---|---|---|---|
| बोलणे | | | |
| लेखन | | | |

१५. आपणा विरुद्ध न्याय प्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंग विषयक प्रकरण वा तत्सम इ. कारवाई चालु आहे काय ?(असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा)

१६. अर्जासोबत खालील छायांकित सत्य प्रती जोडलेल्या आहेत. (जात वैद्यता प्रमाणपत्र व स्त्री उमेदवारांनी विवाहानंतर नावात बदल झाला असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र/ नावात बदल झाल्याचे राजपत्र जोडणे बंधनकारक आहे.)

| | |
|---|---|
| 1. | 2 |
| 3. | 4. |

१७. वर नमुद केलेली सर्व माहिती खरी असनु ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुद्ध कायदेशिर कारवाई होईल यांची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक : (अर्जदाराची स्वाक्षरी व नाव )

**प्रतिज्ञापन**
**नमुना अ**

मी..श्री./श्रीमती/कुमारी,.......................................................................................

श्री ................................................................ यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी

वय .............................. वर्षे राहणार.......................................................................................................

या द्वारे असे जाहिर करतो / करते की,

(१) मी.........................................................................................................................................

............................या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला................................ (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दि. २३ जुलै, २०२० यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ...................आहे. ( असल्यास जन्म दिनांक नमूद करावा.)

(३) दिनांक २३ जुलै, २०२० रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३ जुलै, २०२० व तद नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल. याची मला जाणीव आहे.

**ठिकाण :-**
**दिनांक :-**

**सही/-**

**फौजदारी गुन्हा दाखल नसले बाबतचे हमीपत्र**

मी. श्री/श्रीमती/कुमारी.......................................................................................

वय..................................... वर्ष.............................. सध्या राहणार असे लिहून देते/देतो की, या पत्यावर .वर्षापसून आजपर्यंत राहत आहे.

तरी मी वास्तव्य करीत असलेल्या वरील नमूद कालावधीत माझेविरुद्ध मी राहत असलेल्या कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशनच्या आभिलेखावर काहीएक दखलपात्र गुन्हा अथवा आक्षेपार्ह नोंदी नाही.

**सही/-**

**जा.क्र./पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र. क्र. ३९३/३९४/२०२४**

# वेटलिफ्टिंगमध्ये मध्य रेल्वे चॅम्पियन

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने मुंबईच्या महालक्ष्मी मैदानात आयोजित करण्यात आलेल्या १०व्या महिला अखिल भारतीय रेल्वे वेटलिफ्टिंग स्पर्धेचे सांघिक विजेतेपद पटकावत सुवर्णपदक जिंकले. मध्य रेल्वेच्या महिला वेटलिफ्टर्सनी उत्कृष्ट कामगिरी करून राष्ट्रीय विक्रम मोडीत काढत संघाला एकूण २२७ गुणांसह शानदार विजेतेपद मिळवून दिले. पश्चिम रेल्वे संघ २२४ गुणांसह उपविजेता ठरला.




वेस्टर्न रेल्वे स्पोर्ट्स असोसिएशन (डब्लूआरएसऐ)च्या वतीने आयोजित या प्रतिष्ठित स्पर्धेत सर्व अव्वल रेल्वे वेटलिफ्टर्सचा सहभाग होता. मध्य रेल्वेच्या महिला संघातील वंशिता वर्मा (सीसीटीसी, मुंबई) हिने क्लीन अ‍ॅण्ड जर्क प्रकरात दोन नवीन राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित करून ८१ किलो गटात सुवर्णपदक प्राप्त केले. ४९ किलो गटात सारिका शिनगारे (वरिष्ठ लिपिक, लोणावळा) हिने, ५५ किलो गटात साक्षी म्हस्के (सीसीटीसी, लोणावळा) आणि ४९ किलो गटात सारिका शिनगारे (वरिष्ठ लिपिक, लोणावळा) हिने रौप्यपदक जिंकले. याशिवाय ७६ किलो गटात केतकी नवले (सीसीटीसी, मुंबई विभाग) आणि ८७ किलो गटात सेहल भोंगळे (पॉइंट्समन, सोलापूर विभाग) हिने कांस्यपदकाला गवसणी घातली. या सर्वांचे अभिनंदन होत आहे.

# इंग्लंडचा क्रिकेटपटू मलान निवृत्त

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंडचा स्टार खेळाडू डेव्हिड मलानने अखेर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त होत असल्याचे जाहीर केले. एकेकाळी ट्वेंटी-२० क्रिकेटच्या क्रमवारीत अव्वल स्थानी राहणारा मलान बराच काळ संधीच्या शोधात होता. सातत्याने इंग्लिश संघातून त्याला डावलले गेले. आता ३७ वर्षीय खेळाडूने निवृत्तीची घोषणा केली.

वनडे विश्वचषक २०२३पासून मलान इंग्लंडच्या संघातून बाहेर होता. त्याची आंतरराष्ट्रीय कारकीर्द मोठी नसली तरी प्रभावी नक्कीच राहिली. क्रिकेटच्या सर्वात लहान फॉरमॅटमध्ये अर्थात ट्वेंटी-२० क्रिकेटमध्ये मलानच्या नावावर १८०० धावांची नोंद आहे, तर वन डे क्रिकेटमध्ये त्याने १४०० धावा केल्या आहेत.

डेव्हिड मलानने २२ कसोटी सामने खेळले असून यादरम्यान त्याला १०७४ धावा करता आल्या. याशिवाय त्याने एक शतक आणि नऊ अर्धशतके झळकावली. वनडे क्रिकेटमध्ये त्याने सहा शतके आणि सातवेळा अर्धशतकी खेळी केली. ट्वेंटी-२०मधील स्फोटक फलंदाज म्हणून



त्याची ओळख होती. त्याने या फॉरमॅटमध्ये एक शतक आणि १६ अर्धशतके झळकावली आहेत. देशांतर्गत क्रिकेटमध्येदेखील मलानला प्रभावी कामगिरी करण्यात यश आले.

दरम्यान, जगातील सर्वात लोकप्रिय ट्वेंटी-२० लीग असलेल्या आयपीएलमध्येही डेव्हिड मलान खेळला आहे. त्याने २०२१मध्ये पंजाब किंग्जच्या संघासाठी एक सामना खेळला होता, पण त्याला या सामन्यात केवळ २६ धावा करता आल्या. त्यानंतर तो आयपीएलमध्ये दिसला नाही. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झालेला मलान देशांतर्गत क्रिकेटमध्ये खेळू शकतो.

# सीकेटी ज्युनिअर कॉलेजचे कुस्तीपटू विद्यार्थी चमकले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय आणि पनवेल महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने नावडे येथे झालेल्या जिल्हास्तरीय शालेय कुस्ती (ग्रीको रोमन) स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी चमक दाखवली.

यामध्ये वेदांत विनोद नाईक, पवन ईश्वर पावशे (दोघे बारावी सायन्स) व पार्थ श्याम पाटील (बारावी कॉमर्स) या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला. या विद्यार्थ्यांची मुंबई विभागीय शालेय कुस्ती ग्रीको रोमन स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

याबद्दल यशस्वी विद्यार्थ्यांचे जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख,



अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, स्वाती पाटील तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# 'बीसीबी'कडून शाकिबला दिलासा

**ढाका** : शाकिब अल हसनला दिलासा मिळाला आहे. जोपर्यंत शाकिबवरील सर्व आरोप सिद्ध होत नाहीत तोपर्यंत हा अष्टपैलू खेळाडू आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळत राहणार असल्याचे बांगलादेश क्रिकेट बोर्डाने (बीसीबी) स्पष्ट केले आहे.

पाकिस्तानसोबतची कसोटी मालिका सुरू होण्याआधी बांगलादेशमध्ये दंगल व अराजकतेचे वातावरण होते. यादरम्यानच अहवालानुसार ५ ऑगस्ट रोजी बांगलादेश दंगलीत एका तरुणाची हत्या करण्यात आली होती, ज्यामध्ये क्रिकेटर शाकिबचेही नाव समोर आले. मृत रफीफुल इस्लामच्या वकिलांनी बीओबीकडे शाकिबला क्रिकेटच्या सर्व फॉरमॅटमधून काढून टाकण्याची विनंती केली होती. बीसीबीचे अध्यक्ष फारूख अहमद यांनी दिलेल्या माहितीनुसार शाकिब आंतरराष्ट्रीय संघासाठी खेळत राहणार आहे. शाकिबला देशात परत बोलवण्यासाठी बोर्डाला कायदेशीर नोटीस मिळाली होती, पण आम्ही त्याला याबाबत माहिती दिली आहे. फक्त एफआयआर नोंदवण्यात आला आहे. तपास पूर्ण होईपर्यंत आणि तो आरोप सिद्ध होईपर्यंत शकिब खेळत राहणार आहे. फारूकी अहमद पुढे म्हणाले, बांगलादेशचा संघ पाकिस्तानविरूद्धच्या मालिकेनंतर भारत दौऱ्यावर जाणार आहे आणि या मालिकेत शाकिबने खेळावे असे आम्हाला वाटते. क्रिकेट बोर्डाने करार केलेला तो खेळाडू आहे आणि गरज पडल्यास त्याला आम्ही कायदेशीर मदतही करू.

# कुस्ती स्पर्धेत रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचे सुयश

## विद्यार्थ्यांनी आठ सुवर्ण, तीन रौप्यपदके जिंकली

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने कुस्ती ग्रीको रोमन या प्रकारात आठ सुवर्ण आणि तीन रौप्यपदक जिंकून घवघवीत यश मिळवले आहे. या स्पर्धेचे आयोजन राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय आणि पनवेल महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने नावडे येथे करण्यात आले होते.

१७ वर्ष गटातील प्रज्वल वास्कर, द्रुशणा मुसळे, अजित झिने व नैतिक घरत यांनी सुवर्ण; १९ वर्ष गटात पार्थ सपकाळ, विक्रांत सिंग, अंषु साह, हर्शित नाईक यांनी सुवर्ण; तर आकाश



सहानी, आदित्य कोंडलकर, तनिल उकर्डे यांनी रौप्यपदक मिळवले.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ. एस.टी. गडदे, कार्यकारी मंडळाचे सदस्य संजय भगत, स्कूल कमिटी सदस्य प्रभाकर जोशी, प्राचार्य निशा नायर यांनी विजेत्या खेळाडूंचे तसेच क्रीडा शिक्षक प्रवीण पाटील व संभाजी जाधव यांचे अभिनंदन केले.

# पनवेलमध्ये आमदार चषक दहीहंडी उत्सव रंगला

**पनवेल** : भाजप व युवा मोर्चा पनवेल शहर यांच्या वतीने आमदार चषक दहीहंडी उत्सव २०२४चे आयोजन मंगळवारी शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहासमोरील आवारात करण्यात आले होते. आमदार प्रशांत ठाकूर यांनी या उत्सावाला भेट देत सर्वांना शुभेच्छा दिल्या. ही हंडी फोडण्याचा मान कोळीवाडा येथील जय महाराष्ट्र शिवतेज व्यायामशाळा मंडळाने मिळवला. त्यांना माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते बक्षीस आणि आकर्षक ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. प्रथमच आयोजित केलेल्या या दहीहंडीला नागरिकांनी गर्दी जमली होती तसेच रीलस्टार श्रृतीक कोळंबेकर आणि सोनाली गुरव यांची उपस्थिती लाभली. आमदार चषक दहीहंडी उत्सवात पाच लाख ५५ हजार ५५५ रुपयांची आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली होती तसेच या ठिकाणी सलामी देणाऱ्या प्रत्येक गोविंदा पथकाला बक्षीस देऊन गौरविण्यात आले. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, चारुशीला घरत, चिटणीस अमरीश मोकल, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्ष राजश्री वावेकर, माजी नगरसेवक राजू सोनी, अजय बहिरा, माजी नगरसेविका अ‍ॅड. वृषाली वाघमारे, नीता माळी, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, सरचिटणीस चिन्मय समेळ, भाजप प्रभाग क्रमांक १९चे अध्यक्ष पवन सोनी, शहर उपाध्यक्ष अमित ओझे, युवा मोर्चा शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, विधानसभा संघटक रोहित जगताप, प्रवीण मोरबाळे, प्रशांत शेट्टे, मयूर आंग्रे, शुभम कांबळे, अक्षय सिंग, संदीप पाटील, सर्वज्ञ ठाकूर, कोमल कोळी, निकिता फडके, शिवानी घरत आदी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.







**मुरुड : गोपाळकाला म्हटले की दहीहंडी फोडणे आलेच, पण नांदगाव खारीकवाडा गावकीच्या वतीने दहीहंडीआधी कृष्णाची रासक्रीडा ही गावकरी मंडळी त्याचे रूप साकारून गोफ व क्रीडा करून सादर करतात. गेल्या शंभरपेक्षा जास्त वर्षांची ही परंपरा यंदाही मोठ्या उत्साहात जपली गेली.** (छाया : सुधीर नाझरे)







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com